॥श्री॥

२५ मे २०१९.

## - छांदोग्य उपनिषद -

वेदानां सामवेदोऽस्मि असे म्हणून प्रत्यक्ष भगवंताने ज्याला विभूति म्हणून गौरवले, त्या सामवेदाच्या ब्राह्मणाच्या अंतर्गत हे छांदोग्य उपनिषद येते. आणि वेदांच्या चार महावाक्यांपैकी 'तत्त्वमसि' हे सर्वपरिचित महावाक्यही याच उपनिषदातील आहे.

विस्तारदृष्ट्या देखील हे उपनिषद बरेच मोठे म्हणजे बृहदारण्यकाच्या खालोखाल आहे. एकूण ८ अध्यायात आणि १५४ खंडात हे विभागले आहे.

वेदयति इति वेदः। म्हणजेच सूक्ष्मतम अशा ब्रह्मतत्त्वाचे किंवा धर्माच्या अतींद्रिय स्वरूपाचे ज्ञान करून देतात ते वेद। त्यातही वेदातील अंतिम उच्चतम ज्ञान ज्यात आहे त्या उपनिषदांना वेदांत किंवा वेदशिरस (वेदांचे मस्तक) असे म्हटले जाते.

वेदांतील ज्ञानकांडाची सर्वोत्तम अभिव्यक्ती उपनिषदातच आढळते.

प्रस्थानत्रयीमध्ये उपनिषदांचा अंतर्भाव होतो.

प्रस्थान - प्रकृष्ट-स्थिति-साधनम् इति प्रस्थानम्।

सर्वोच्च स्थितीचे फळ निश्चितरूपाने देणारे साधन म्हणजे प्रस्थान आहे आणि बोधाद्वारे प्राप्त होऊ शकणारी ब्रह्मस्थिति हीच सर्वोच्च म्हणजे प्रकृष्ट स्थिति होय.

आध्यात्मिक, अधिभौतिक, अधिदैविक शांति मला प्राप्त होवो.

कालिदास - कुमारसंभव - शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्॥

प्रार्थना - नम्रता, ज्ञानप्राप्तिची उत्सुकता, ईश्वरी कृपेची आवश्यकता

©www.madhavveeraghuveer.com

JANUARY
2
WEDNESDAY

मार्गशीर्ष कृ. ५ संवत २०६९
बुधवार २/१/२०१३

DECEMBER 2012

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

(६ जानेवारी)

प्रथम अध्याय १३ खंड — उद्गीथ उपासना - सामूहिक हुंकार - ॐकार हेच जीवनाधार तत्त्व आहे.
उषस्ति - चाक्रायण कथा

(३ मार्च)

द्वितीय अध्याय २४ खंड — सामोपासना - समभावात् साम:।
अनध्यवसायाची, राहत्या ठिकाणाची निंदा करू नये अशा सामाजिक जाणिवा यात जागवल्या आहेत.
देव शब्दाची व्युत्पत्ती. द्योतनाद् देव:।

(७ एप्रिल)

तृतीय अध्याय १८ खंड — मधुविद्या, गायत्री, शांडिल्य विद्या, ब्रह्मांडाची उत्पत्ति. पुरुषयज्ञ - त्रिसुपर्ण.
भूताकाश - देहाकाश - हृदयाकाश

चतुर्थ अध्याय १७ खंड — सयुग्वा रैक्व आणि सत्यकाम जाबाल (४ जून)

(१४ जुलै)

पंचम अध्याय २४ खंड — प्राणविद्या - प्राणाची श्रेष्ठता, व्यापकता - कथा.
प्राणाहुतीमागची कारणमीमांसा.
प्राणाचे पुनरावर्तन.

© www.madhaveeraghuveer.com

(२३ ऑगस्ट)

षष्ठम अध्याय १६ खंड

आरुणी - श्वेतकेतु हा संवाद महत्त्वाचा आहे. एकमेवाद्वितीय ब्रह्माची ओळख यात होते. परमतत्त्वाच्या शक्तीची उत्क्रांती म्हणजे सृष्टी.
संवित म्हणजे जाणिव - विश्वचैतन्याचेच पण नित्य परिवर्तनशील रूप.
एकाच जाणिवेचे स्फुरण म्हणजे अनुभवविश्वाची उभारणी. सर्वांच्या अंतर्यामी एकच चैतन्य!
तत्त्वमसि - महावाक्य - ६.८.७

सप्तमोऽध्यायः २६ खंड

नारद - सनत्कुमार संवाद - आत्मज्ञानाची अभिव्यक्ती.
ऐहिक सुखाची इच्छा - संकुचित मन
आत्मसुखाची प्रचीती - जीवनाच्या सर्वांगीण उन्मेषाचे दर्शन!
आत्मसंकोचात दुःख तर आत्मविस्तारातच खरे सुख आहे. त्यामुळे तटस्थ दृष्टीकोनच भूम्याचा साक्षात्कार होऊ शकतो.
यो वै भूमा तत् सुखम्।

अष्टमोऽध्यायः १५ खंड

ब्रह्मोपासनेचे प्रतिपादन।
भौतिकशास्त्र - जीवशास्त्र - शरीरशास्त्र. या सर्व शास्त्रांचे मूळ येथे सापडते.
इंद्र विरोचन कथा।
नामरूपाच्या पलीकडे जाण्यातच परमोच्च सुख आहे.

© www.madhaveeraghuveer.com

छांदोग्य उपनिषद - सामवेदीय तलवकार शाखेच्या ब्राह्मणांतर्गत हे उपनिषद येते.

८ अध्याय आणि १५३ खंड आहेत.

यापैकी पहिल्या ५ अध्यायात वेगवेगळ्या उपासनांची चर्चा आहे तर शेवटच्या ३ अध्यायात आत्मज्ञानाचे वर्णन आहे.

अनेक कथा, आख्यानातून काही तत्वे, मूल्ये समजावून सांगितली आहेत.

सामगायनात ॐ चा प्रयोग प्रामुख्याने केला जातो. ॐकार ही परब्रह्माची प्रथम अभिव्यक्ती आहे. उद्गीथ उपासना म्हणजेच ॐकार. यज्ञामध्ये सामवेदाच्या गायकाला उद्गाता म्हणतात.

© www.madhaveeraghuveer.com

*SUNDAY,* **JANUARY 6**

मार्गशीर्ष कृ. ९ संवत २०६९

*With Best Compliments From*

२८ मे २०१८

FEBRUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

मार्गशीर्ष कृ. ११ संवत २०६९
मंगळवार ८/१/२०१३

JANUARY 8 TUESDAY

## - छांदोग्य उपनिषद -

ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि
वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रम्।
अथो बलम्। इन्द्रियाणि च सर्वाणि।
सर्वं ब्रह्मौपनिषदं माऽहं ब्रह्म निराकुर्याम्।
मा मा ब्रह्म निराकरोद्।
अनिराकरणमस्तु अनिराकरणं मेऽस्तु।
तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्माः।
ते मयि सन्तु ते मयि सन्तु।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

ॐ प्रणव हा ब्रह्मनिर्देशक शब्द आहे. त्या परब्रह्माचे स्मरण करुन त्याला ही प्रार्थना केली आहे. माझी सर्व अंगे, वाणी, प्राण, डोळे, कान ही सर्व इंद्रिये व त्यांचे सामर्थ्य पुष्ट होवो. त्यांना आत्मिक शक्ती प्राप्त होऊ दे.
मी ब्रह्माचा अस्वीकार न करावा आणि ब्रह्मानेही माझा (मी जसा आहे तसा) स्वीकार करावा. आमचा परस्पर संबंध कायम रहावा. Mutual Acceptence
मी अभ्यासामध्ये रत झालेलो आहे. मला ब्रह्माच्या ध्यास लागलेला आहे. त्याच्या प्राप्तिसाठी उपनिषदात वर्णन केलेले सर्व गुण माझ्यात येवोत. ते सर्व धर्म माझ्यात येवोत. निश्चितपणे येवोत. (विदशक्ती)

## प्रथमोऽध्यायः।

### प्रथमः खण्डः।

ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत। ओमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम्॥१॥

सामगायन करणाऱ्याला उद्गाता म्हणतात. साम मंत्राचे गायन करण्यापूर्वी ॐ चा उच्चार करायला हवा. उद्गीथ म्हणून जाणल्या जाणाऱ्या ॐकाराची उपासना करायला हवी. ॐ हे परब्रह्मही आहे व परब्रह्मवाचक शब्दही आहे. या ओंकाराची उपासना कशी करायची याविषयी कठ, प्रश्न, माण्डूक्य उपनिषदात मार्गदर्शन केले आहे. कठ १.२.१६.

ओंकारोपासनेने अनेक रोग बरे होतात, प्रतिकारशक्ती वाढते. शरीर, मन, बुद्धी शुद्ध होते. ऊर्जा प्राप्त होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परब्रह्माची प्राप्ति होते. ॐ कार ही विभूति आहे, त्याचे फळ काय मिळते हे उलगडून सांगणे म्हणजेच उपव्याख्यान। प्रणवः सर्ववेदेषु।

एषां भूतानां पृथिवी रसः पृथिव्या आपो रसः। अपामोषधयो रस ओषधीनां पुरुषो रसः पुरुषस्य वाग्रसो वाचः ऋग्रस ऋचः साम रस साम्न उद्गीथो रसः॥२॥

पंचमहाभूतांमध्ये पृथ्वी ही सर्वात महत्त्वाची आहे. छांदोग्य तीनच भूते मानते. तेज, जल, पृथ्वी

© www.madhuveeraghuveer.com

With Best Compliments From

सर्वात प्रथम विश्व सामावून घेण्यासाठी आकाशाची निर्मिती झाली. त्यात संचार करणारा वायु म्हणजे मातरिश्वा निर्माण झाला. त्याच्यामुळेच आपण श्वास घेऊ शकतो, हालचाली करू शकतो. या वायुच्या घर्षणाने तेज निर्माण झाले. या तेजामुळेच उत्पत्ति झाली. कोणत्याही निर्मितीसाठी उष्ण आवश्यक आहे. तसेच जलही आहे.

तेज व जलापासून पृथ्वी झाली. पृथ्वीपासून अन्न अन्नातून सप्त धातु (श्रेष्ठ धातु-वीर्य) निर्माण झाले. त्यापासून पुरुषाची निर्मिती झाली.

पाण्यामुळे ओषधी (एकदा फळ देऊन नष्ट होणाऱ्या उदा. गहू, ज्वारी, बाजरी) तसेच वनस्पती (वर्षानुवर्षे फळ देणाऱ्या- आंबा, पेरू, चिकू) निर्माण झाल्या. या ओषधी पुरुषाला पुष्ट करतात. त्यामुळे ओषधींचे सार म्हणजे पुरुष (अन्नात् भवानि भूतानि) आहे. तर पुरुषाच्या जीवनात मुख्य आहे ती वाणी (मूल जन्माला आले की प्रथम रडते) या वाणीच्या सहाय्याने सर्व व्यवहार चालतात. या वाणीत मुख्य आहेत त्या ऋचा- स्फुरलेली सूक्ते. चार वेद! या वेदांमध्ये श्रेष्ठ आहे तो सामवेद. या सामाचे सार आहे तो ॐकार

या ओंकारात सर्व काही सामावले आहे.

थोडक्यात या ओंकारापासून सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ति आहे व पुन्हा ब्रह्मांडाचे सार म्हणजे हा ॐकार आहे.

© www.madhavraghuveer.com

स एष रसानां रसतमः परमः परार्ध्योऽष्टमो यदुद्गीथः ॥३॥

जो हा ओंकार सर्व रसांमध्ये श्रेष्ठ रस आहे. हा अष्टवा रस आहे. पृथ्वी - आप - ओषधी - पुरुष - वाणी - ऋक् - साम या सात रसांनतर आठवा रस म्हणजे सामाचे साररूप ओंकार आहे. अर्थातच ते परब्रह्माचे प्रतीक आहे. नव्हे ते परब्रह्मच आहे.
जो परमात्म्याचे आलंबन होण्यास योग्य आहे व उपासनीय आहे. ∴ ओंकाराची उपासना करायला हवी.

कतमा कतमर्क्कतमत्कतमत्साम कतमः कतम उद्गीथ इति विमृष्टं भवति ॥१॥

कतमा कतमा ऋक् कतमत् कतमत् साम कतमः कतमः उद्गीथ इति विमृष्टं भवति।
कुठली ऋक् असते? कुठला साम असतो? प्रणव कुठला असतो? याचा आता विचार केला जात आहे.



नेमके ऋचा कशाला व साम कशाला म्हणतात कारण ऋग्वेदातीलच काही ऋचा सामवेदात गायल्या जातात. त्यामुळे त्यापैकी ऋचा कशाला म्हणायचे व साम कशाला म्हणतात ते समजत नाही, प्रणव म्हणजे नक्की नेमके काय याचे आकलन होत नाही. ते आचार्यांनी समजावून सांगावे असा प्रश्न जमलेल्या लोकांनी उद्गात्यांना विचारला.

© www.madhaveeraghuveer.com

वागेवर्क् प्राण: सामोमित्येतदक्षरमुद्गीथ:।
तद्वा एतन्मिथुनं यद्वाक्च प्राणश्चर्क् च साम च॥५॥

चिंतनाच्या तरल अवस्थेमध्ये ऋषींच्या मुखातून जी वाणि बाहेर पडली ती ऋचेच्या रुपात! त्यामागची उर्जा म्हणजे प्राण म्हणजेच साम. हे दोन्ही एकमेकांना जोडलेले आहेत. सामगान म्हणजे वाणीची कलाकारिता नाही. त्यात वाणीबरोबर प्राणांचे स्पंदन जोडले असेल तरच अंत: स्फूर्त तरंग उठतात. प्राणओतून केले जाते ते सामगायन आणि ऋचा म्हणजे प्रसन्नवाणी.

त्यामुळे वाक् व प्राण हे मिथुन आहे.

उद्गीथ किंवा ॐकार हा सर्वश्रेष्ठ रस आहे. यात ॐकाराच्या व्याप्तिगुणाबद्दल सांगितले आहे. कारण हे कार्यात अनुस्यूत असते. (घटामध्ये माती)

वाक् व प्राण हे ऋक् व सामाचे कारण आहे. त्यामुळे ते दोन्ही एकच आहेत. वाक् व प्राण हे जोडलेले आहेत. ते पृथक् नाहीत.

तदेतन्मिथुनमोमित्येतस्मिन्नक्षरे संसृज्यते यदा वै मिथुनौ समागच्छत आपयतो वै तावन्योन्यस्य कामम्॥६॥

ऋषींना कवी म्हटले जाते. त्यांची कल्पना उत्तुंग भरारी घेते. इथे वाक् व प्राण आणि ऋक् साम हे मिथुन (पतिपत्नी) मानले आहे. त्यांना एकमेकांविषयी ओढ आहे. त्यांच्या मीलनातून अपत्यनिर्मिती होते. तसेच वाक् व प्राण यांच्या मीलनातून ॐकाराचा जन्म झाला.

एकत्र येण्यात कामना जी आहे. आणि त्यामुळेच

FEBRUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

Q-TDS return
PF payamnt

पौष शु. ४ संवत २०६९
मंगळवार १५/१/२०१३

JANUARY
15
TUESDAY

ॐकाराची उपासना सर्व इच्छा पूर्ण करते.

ओंकाराचा उच्चार करताना नाभिपासून जोर लावावा लागतो. दीर्घ श्वास घेऊन उच्चारण करावे लागते म्हणजेच श्वास व बळ दोन्ही एकत्र यावे लागतात त्याखेरीज ॐकार उच्चारण शक्य नाही.

आपयिता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्ते ॥ ७॥

हे जाणून जो अशाप्रकारे ॐकाराची उपासना करतो, त्या उपासकाला सर्व कामनांची प्राप्ति होते. (विद् - जाणणे) जाणकार, बुद्धिमान उपासकाला हे रहस्य कळते, व तोच या मार्गाने जातो. ॐकाराच्या उपासनेने त्याला ही शक्ती प्राप्त होते व त्यामुळे तो इतरांच्या इच्छांची देखील पूर्ति करतो.

तद्वा एतदनुज्ञाक्षरं यद्धि किं चानुजानात्योमित्येव तदाह एषा एव समृद्धिर्यदनुज्ञा । समर्धयिता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वान् अक्षरमुद्गीथमुपास्ते ॥ ८ ॥

ॐ इति एतत् अनुकृतिः । - तैत्तिरीय उपनिषद. यज्ञप्रसंगी कोणताही प्रश्न विचारला तरी अनुमती देताना ओमचा उच्चार केला जातो. व्यवहारातही ज्येष्ठ व्यक्ती हो न म्हणता ओम् म्हणतात. ओंकाराची उपासना करणाऱ्या व्यक्तीने ओम् म्हटले की कामना पूर्ण होतात. समृद्धी प्राप्त होते. ज्येष्ठांच्या आशीर्वादात ते सामर्थ्य असते. संतांचे आशीर्वाद निश्चित फळतात.



© www.madhaveeraghuveer.com

तेनेयं त्रयी विद्या वर्तत ओमित्याश्रावयत्योमिति शंसत्योमित्युद्गायत्येतस्यैवाक्षरस्यापचित्यै महिम्ना रसेन॥

त्रयी विद्या - ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद
अपचिति - पूजा । रसेन - हविर्द्रव्यांनी

यज्ञासाठी १८ व्यक्ती आवश्यक (किमान) असतात
ऋग्वेद - होतृ - मंत्रांनी देवतांना आवाहन करतो.
यजुर्वेद - अध्वर्यु - " यजनकार्य करतो व यजमानांकडून करवून घेतो.
सामवेद - उद्गातृ - मंत्रगायनाने देवांना प्रसन्न करून घेतो.
अथर्ववेद - ब्रह्मन - सर्वांच्या कामावर देखरेख ठेवून कामे चोख करवून घेणे.
असे ४ वेदांचे ४ ऋत्विज, त्यांचे ३-३ सहायक शिवाय यजमान व यजमानपत्नी असे १८ जणां
ॐ इति आश्रावयति - ॐ ने युक्त मंत्र ऐकवतो.
ॐ इति शंसति - आवाहन व स्तुति करतो.
ॐ इति उद्गायति - सामांचे उद्गान करतो.
यातील ॐ च्या माहात्म्यानेच यज्ञभाग चालतात.
यातील रस म्हणजे हविर्द्रव्य अग्निमध्ये अर्पण केली जातात. या यज्ञाद्वारे परब्रह्माची (ॐ ची) उपासना केली जाते. ॐ ने दिलेली आहुति सूर्यापर्यंत पोहोचते व स्तर देवांना पोहोचवली जाते. त्यामुळे समृद्धी येते. ऐहिक व पारमार्थिक ऐश्वर्य या उपासनेने प्राप्त होते.

© www.madhaveeraghuveer.com

FEBRUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

पौष शु. ६ संवत २०६९
गुरुवार १७/१/२०१३

JANUARY
17
THURSDAY

तेनोभौ कुरुतो यश्चैतदेवं वेद यश्च न वेद। नाना तु विद्या चाविद्या च यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवतीति खलु एतस्य एव अक्षरस्य उपव्याख्यानं भवति ॥१०॥

हे ॐ काराचे रहस्य जाणणारे ज्ञानी तर न जाणणारे अज्ञानी असतात. हे विद्यावान आणि अविद्यावान दोघेही कर्म करत असले तरी कर्माचे फळ दोघांना वेगवेगळे मिळते. त्याचे रहस्य जाणून श्रद्धेने व योगयुक्त होऊन जे कर्म केले जाते ते अधिक समर्थ, बलयुक्त (वीर्यवत्तर) होते.

मात्र अविद्वानांना इतके चांगले फळ मिळत नाही. असे हे या ॐ काराचे उपव्याख्यान आहे.

ॐ काराचे माहात्म्य जाणून घ्यावे
त्याचे उच्चारण नीट समजावून घ्यावे.

जाणकार जेव्हा ॐ काराचे शास्त्रशुद्ध उच्चारण करतात तेव्हा त्यांच्या व ऐकणाऱ्यांच्या शरीरातील रोम न् रोम कंप पावतो. या दृश्य परिणामाबरोबर ब्रह्मप्राप्ति निश्चितपणे होते हा मुख्य व अव्यक्त परिणाम आहे.

© www.madhaveeraghuveer.com

द्वितीयः खण्डः।

देवासुरा ह वै यत्र संयेतिर उभये प्राजापत्यास्तद्ध देवा उद्गीथमाजह्रुरनेनैनानभिभविष्याम इति ॥१॥

संयेतिरे- युद्ध करु लागले. आजह्रु:- अनुष्ठान केलेले.
प्राजापत्या:- प्रजापतीची मुले.
अभिभविष्याम:- पराभव करु शकु.

देव आणि असुर ही प्रजापतीचीच मुले आहेत. त्यांच्यात युद्ध सुरु झाले. देवांनी उद्गीथाची उपासना सुरु केली. या उपासनेने आपण असुरांना पराभूत करु असे त्यांना वाटले.

देव आणि असुर हे कोणी वेगळे, स्वर्गातले नसतात तर आपल्यातलेच असतात. दिव् म्हणजे प्रकाशणे. त्यावरुन प्रकाशणारे ज्ञानाने युक्त, सत्प्रवृत्त ते देव आणि केवळ शरीर व विषयांना महत्व देणारे (असुषु रमते इति) ते असुर आहेत. थोडक्यात हा दोन वृत्तींमधील संघर्ष आहे.

जन्मत: जे शरीर, मन, बुद्धी मिळाली आहे त्याचा उपयोग सत्कृत्य की दुष्कृत्यासाठी करायचा हे आपणच ठरवायचे असते.

ते ह नासिक्यं प्राणमुद्गीथमुपासांचक्रिरे । तं हासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तेनोभयं जिघ्रति सुरभि च दुर्गन्धि च पाप्मना ह्येष विद्धः ॥२॥

प्रथम देवांनी सचेतन नाकाने (प्राणयुक्त) उपासना केली म्हणजे नाकालाच उद्गीथ समजून उपासना केली. पण याची वार्ता असुरांना आधीच लागल्याने त्यांनी नाकाला पापाने

© www.madhuraveeraghuveer.com

विद्ध केले. त्यामुळे नाक सुगंध व दुर्गंध दोन्ही घेते, कारण ते पापाने वेधले गेले आहे.

सद्विचारांनी नाकावर उत्तम संस्कार करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा उपयोग झाला नाही. वस्तुत: नाकाने सुगंधच घ्यायला हवा. परंतु पापाच्या प्रभावाने, विषयांच्या ओढीने त्याला दारू, सिगरेटचा वास प्रिय वाटू लागला. देव नाकाला आपल्या प्रभावाखाली आणू शकले नाहीत.

अशाच प्रकारे देवांनी वाणीला उद्गीथ मानून उपासना करायचे ठरवले. तसेच डोळे, कान, मन यांची उपासना करायचे ठरवले. परंतु असुरांनी त्यांना विद्ध केल्याने (पापाने) डोळा चांगले वाईट दोन्ही बघतो. तसेच कान ऐकण्याजोगे व न ऐकण्याजोगे सर्व काही ऐकतात. त्याचप्रमाणे मन चांगले व वाईट संकल्प करते. करायला हव्यात अशा आणि करू नये अशाही गोष्टी करण्याचे मन ठरवते. मंत्र - ४,५,६,७

अशा रीतीने असुरांनी सर्वांना फितुर केले म्हणूनच त्यांना प्रलोभने दाखवली त्यामुळे त्यांना वाईटाचीही ओढ



वाटू लागली. त्यांनी सत्यमार्ग सोडला.

तेव्हा देवांनी मुख्य प्राणाच्या रूपाने उद्गीथाची उपासना करायचे ठरवले. तेव्हा असुरांनी प्राणावर हल्ला केला. परंतु मातीच्या ढेकळाने दगडाला टक्कर दिली असता ढेकूळच फुटणार, दगडाला काहीच होत नाही. त्याचप्रमाणे प्राणांना टक्कर देऊन असुरच नष्ट झाले.

मुख्य प्राण हे चैतन्यस्वरूप आहेत. त्यांना शुद्ध ठेवले तर इंद्रिये वश होतात.

उद्गीथ उपासना प्राणांना शक्ती देते, शुद्ध ठेवते.

© www.madhaveeraghuveer.com

JANUARY

21

MONDAY

पौष शु. १० संवत २०६९

सोमवार २१/१/२०१३

MVAT for Dec./ Oct.-Dec.
ESI Payment

DECEMBER 2012

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

एवं यथा अश्मानमाखणमृत्वा विध्वंसत एवं हैव स विध्वंसते य एवंविदि पापं कामयते यश्च एनम् अभिदासति स एषोऽश्माखणः ॥८॥

ज्याप्रमाणे कठीण खडकावर मातीच्या ढेकळाचा काहीच परिणाम होत नाही. उलट तेच ढेकूळ फुटून नष्ट होते तसेच ज्याने उद्‌गीथ उपासनेने ज्याने आपल्या प्राणांना समर्थ केले आहे त्यांना त्रास देण्याची, त्यांचे वाईट करण्याची जो इच्छा करतो. तो स्वतःच नष्ट होतो. ज्याने स्वतःला आध्यात्मिकदृष्ट्या खंबीर बनवले आहे त्याला पीडा देणारे निष्प्रभ होतात. हतबल होतात. त्यांचे काहीच चालत नाही. आणि ज्याची प्राणशक्ती अभेद्य आहे तोच स्थिर, दृढ, पक्का व धारदार असतो. ∴ तान्ह्या बाळाला मधातून सोने चाटवताना त्याला 'अश्मा भव' 'परशु भव' असा आशीर्वाद दिला जातो.

नैवैतेन सुरभि न दुर्गन्धि विजानाति अपहतपाप्मा हि एष तेन यदश्नाति यत्पिबति तेन इतरान् प्राणान् (इंद्रियाणि) अवति । एतमु एवान्ततोऽवित्त्वोऽत्क्रामति व्याददाति एव अन्तत इति ॥९॥

प्राण हा अपहतपाप्मा म्हणजे ज्याच्यापासून पाप दूर गेले आहे असा असतो. त्याला मोह होत नाही ∴ पापही नाही. परंतु खाल्लेल्या / प्यालेल्या अन्नाने ~~प्रा~~ मुख्य प्राण हा इतर प्राणांना (इंद्रियांना) पुष्ट करतो. त्यातून त्यांना शक्तीचा पुरवठा होतो. परंतु ज्यावेळी प्राण निघून जातो तेव्हा इतर इंद्रियांना अन्न न मिळाल्यामुळे ती आ वासतात

याच कारणामुळे मृत्युसमयी तोंड वासलेले असते. कारण इंद्रियांना अन्न हवे असते परंतु प्राण निघून गेल्यामुळे ते शक्य होत नाही.

प्राण हा केवळ श्रेयसाचा विचार करतो, प्रेयसाचा नाही त्यामुळे तो मोहात पडत नाही. मात्र इंद्रिये स्वार्थी असल्याने विषयात रमतात. या चुकीच्या आचरणाने देहाचे व प्राणांचे नुकसान होते हे शेवटी त्यांना उमगते. व ती लाजेने काळवंडतात.

तं ह आङ्गिरा उद्गीथमुपासांचक्र एतमु एव आङ्गिरसं मन्यन्ते अङ्गानां यद् रसः॥१०॥

प्राण हा सर्व अंगांचा रस आहे. (अर्क - Core) प्राण आहेत :. सर्व इंद्रिये आहेत. त्यामुळे प्राणाला अंगिरस म्हटले जाते. शिवाय अंगिरा नावाच्या ऋषींनी ही उद्गीथ उपासना केली त्यामुळे प्राणांना त्यांचे नाव मिळाले. (बायकॉट करणे)

ते तं ह बृहस्पतिरुद्गीथमुपासांचक्र एतमु एव बृहस्पतिं मन्यन्ते वाग्घि बृहती तस्या एष पतिः॥११॥

बृहत म्हणजे मोठे, विस्तृत. वाणीच्या व्यापकतेमुळे तिला बृहती म्हटले जाते. त्या वाणीचा पती म्हणजेच देवांचे गुरु बृहस्पती म्हटले जाते. विद्वान व्यक्तीला बृहस्पती म्हणतात. त्यांनी प्राणांची उद्गीथ म्हणून उपासना केली. बृहती या छंदात २ चरण असून पहिल्या चरणात १६ तर दुसऱ्या चरणात २० अक्षरे असतात. एकूण ७ छंद आहेत

With Best Compliments From
S. P. Powder Coating

अनुष्टुभ उष्णिक, गायत्री जगती, त्रिष्टुभ पंक्ती

तेन तं हाऽऽयास्य उद्गीथमुपासांचक्रे एतमु एवाऽऽयास्यं मन्यन्त आस्यात् आदयते ॥१२॥

म्हणूनच आयास्य ऋषींनी ही प्राणांची उद्गीथ म्हणून उपासना केली. मुखातूनच प्राणवायू वायुरूपाने बाहेर पडतो म्हणून प्राणांना आयास्य म्हटले जाते.

तेन तं ह बको दाल्भ्यो विदांचकार। स ह नैमिषीयानामुद्गाता बभूव। स ह स्म एभ्यः कामानागायति ॥१३॥

दल्भाचा मुलगा बकयाने ही उद्गीथ उपासना जाणून घेतली व तो सामर्थ्यवान झाला, आणि नैमिषारण्यात यज्ञ करणाऱ्यांच्यात तो उद्गाता बनला. नैमिषारण्यातील ऋषींच्या इच्छापूर्तीसाठी तो (बक) सामगायन करू लागला. सामगायन हे कौशल्याचे काम आहे. त्यासाठी सूरतालाचे ज्ञान हवे. शिवाय शब्दाचा नेमका अर्थ ठाऊक हवा. हा मान बकाला मिळाला.

आगाता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वान् अक्षरमुद्गीथमुपास्ते इत्यध्यात्मम्।

अशा रीतीने जो विद्वान अक्षर अशा उद्गीथाची उपासना करतो तो इतरांच्या इच्छांना पूर्ण करण्याची प्रार्थना करत गाणारा होतो. हा मान केवळ अशा ज्ञानींनाच मिळतो. ही उद्गीथाची अध्यात्म उपासना आहे.

© www.madhaveeraghuveer.com

१३ जून २०१९



मंत्रसंख्या - १२

तृतीय: खण्ड: ।

अध्यात्म - आधि + आत्मा → आत्मनि सप्तमी दर्शक
आत्मविषयक ज्ञान म्हणजे अध्यात्म।

या खंडात उद्गीथ (ओंकार) उपासना करण्यासाठी दृश्य दैवताची उपासना सांगितली आहे.

अथाधिदैवतं य एवासौ तपति तम् उद्गीथम् उपासीत। उद्यन् वा एष प्रजाभ्य उद्गायति। उद्यन् तमो भयम् अपहन्ति। अपहन्ता ह वै भयस्य तमसः भवति। य एवं वेद।

अधिदैवतामध्ये प्रत्यक्ष दिसणारे काही हवे. सूर्य हा प्रत्यक्ष दिसतो. सूर्यामुळे अन्न, ऊब, उष्णता, प्रकाश मिळतो. धनधान्य प्राप्त होते.
सूर्य उगवताच तमाची भीती दूर होते. तो स्वतः तमाचे निराकरण करणारा आहे. अज्ञानाचे भय दूर होते, माणूस निर्भय होतो, प्रसन्न होतो.

समान उ एवायं चासौ च उष्णोऽयम् उष्णोऽसौ स्वर इतीममाचक्षते स्वर इति प्रत्यास्वर इत्यमुं तस्माद् वा एतम् इमम् अमुम् च उद्गीथं उपासीत।

मागील खंडात उद्गीथ म्हणून प्राणाची उपासना सांगितली होती आता सूर्याची सांगत आहेत. यात साम्य आहे, कारण हा (प्राण) आणि तो (सूर्य) दोन्ही सारखेच आहेत. दोन्ही उष्ण आहेत, गतिशील आहेत व दोघेही

©www.madhaveeraghuveer.com

JANUARY
25
FRIDAY

पौष शु. १४ संवत २०६९
शुक्रवार २५/१/२०१३

ईद-ए-मिलाद

DECEMBER 2012

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

पुन्हा परतून येणार आहेत. रात्रीनंतर पुन्हा सूर्य येतो तसेच मृत्युनंतर (किंवा सुषुप्तिनंतर) जीवही परततो.

अथ खलु व्यानम् एव उद्गीथम् उपासीत। यद्वै प्राणिति स प्राणो यद् अपानिति स अपानः। अथ यः प्राणापानयोः सन्धिः स व्यानो यो व्यानः सा वाक्। तस्मात् अप्राणन् अनपानन् वाचम् अभिव्याहरति।

नंतर आणखी एका प्रकारे उद्गीथ उपासना होऊ शकते, व्यानाला उद्गीथ समजून उपासना करावी. प्राण व अपान या दोन्हींच्या संधिस्थानाला व्यान म्हणतात. यालाच योगात कुंभक (अंतः कुंभक, बाह्यकुंभक) म्हणतात. श्वास सोडल्यावर नवीन श्वास घेण्याच्या आधी (किंवा उलट) क्षणभर काहीच क्रिया नसते.

पूरक — कुंभक — रेचक

श्वास व उच्छ्वास यांच्या मधल्या काळाला व्यान (वाक्) म्हणतात. म्हणूनच मनुष्य प्राण व अपान क्रिया करत नसताना बोलतो. श्वास घेऊनच माणूस बोलू लागतो.

या वाक् स ऋक्। तस्मात् अप्राणन् अनपानन् ऋचम् अभिव्याहरति यत् ऋक् तत् साम तस्मात् अप्राणन् अनपानन् साम गायति। यत् साम स उद्गीथः तस्मात् अप्राणन् अनपानन् उद्गायति।

जी वाणी आहे तीच ऋक आहे. (वाणीनेच ऋचा म्हटली जाते) म्हणून श्वास न घेता व न सोडता ऋचेचे उच्चारण

© www.madhaveeraghuveer.com

केले जाते. जी ऋक् आहे, तीच साम आहे. म्हणजेच श्वास न घेता, न सोडता सामाचे गायन केले जाते.

थोडक्यात व्यान वाणी आहे. वाणी ऋचा आहे. ऋचा साम आहे व साम उद्गीथ आहे. तेव्हा व्यानाची उद्गीथ म्हणून उपासना करावी.

सा म्हणजे ऋचा व म म्हणजे सप्तस्वर यावरून — साम।

अतो यानि अन्यानि वीर्यवन्ति कर्माणि यथा अग्नेः मन्थनम् आजेः सरणम् दृढस्य धनुषः आयमनम् अप्राणन् अनपानन् तानि करोति। एतस्य हेतोः व्यानम् एव उद्गीथम् उपासीत ॥५॥

☆ म्हणून सर्वच वीर्ययुक्त कामे — अग्नीचे मंथन करणे, सीमेपर्यंत धावणे, ऋक धनुष्याला बाण लावणे इ. कामे श्वास रोखून केली जातात. म्हणून व्यानाला उद्गीथ समजून उपासना करावी. श्वास रोखून शर्यत पाहिली जाते.

अथ खलु उद्गीथ-अक्षराणि उपासीत। उद्गीथ इति प्राणः एव उत् प्राणेन हि उत्तिष्ठति वाक् गीः वाचः ह गिरः इति आचक्षते। अन्नं थम् अन्ने हि इदं सर्वं स्थितम्।



ओंकार - अ उ म। उद्गीथ - उत् गी व थ
उत् म्हणजे माणूस प्राणानेच वर उठतो.
गीः म्हणजे वाणी आणि थ म्हणजे अन्न।
अन्नामध्येच सर्व काही स्थित आहे.
नाम व नामी यात काहीच फरक नाही. ∴ ओंकार ← परब्रह्मवाचक
परब्रह्म

©www.madhaveeragniveer.com

१२. आत्मानमन्तत उपसृत्य स्तुवीत कामं ध्यायन् अप्रमत्तो अभ्याशो ह यदस्मै स कामः समृध्येत यत्कामः स्तुवीत इति यत्कामः स्तुवीत इति॥१२॥

सामगायन करणाऱ्याने शेवटी स्वतःच्या नाम, गोत्राचे स्वरूपाचे चिंतन, उच्चारण करून, आपल्या इच्छेचे स्मरण करत कानामात्रेचीही चूक न करता साम गावा म्हणजेच स्तुति करावी. त्याने जी इच्छा मनात धरली असेल ती पूर्ण होते

पूजेला बसताना आपले नाम, गोत्र, कुल, स्थान, देश यांचा उल्लेख केला जातो. व इच्छाही व्यक्त केली जाते. यामध्ये नेमकेपणा आहे. त्याशिवाय अपेक्षित फळ मिळत नाही. प्रत्येक स्तोत्राच्या प्रारंभी ५ तांत्रिक गोष्टींचा निर्देश करणे अनिवार्य आहे.

नाव, ऋषि, देवता, छंद, कीलक, शक्ती, कशासाठी?

श्रीसूक्ताचे ऋषि ५ आहेत.

आनंद, कर्दम, चिक्लीत, इंदिरासुत

वेगवेगळ्या छंदांचा स्पष्ट उल्लेख केला जातो.

जम्बुद्वीपे, भरतखण्डे, पुण्यपत्तने- अक्षांश रेखांश

नाम, कुल, गोत्र सपरिवारसहितं पार्थिव श्रीगणेश मूर्ति पूजनं करिष्ये।

©www.madhaveeraghuveer.com

१४ जून २०१८



मंत्रसंख्या -५

चतुर्थ खण्ड :

ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीतोमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम् ॥१॥

सामगायन करणारा उद्‌गाता ॐ म्हणून सुरुवात करतो. त्या उद्‌गीथ उपासनेची व्याख्या केली जात आहे.

देवा वै ------------ छन्दस्त्वम् ॥२॥
तानु तत्र मृत्युर्यथा ---------- स्वरमेव प्राविशन् ॥३॥

★ मृत्यो: बिभ्यत: देवा - मृत्युला भिणारे देव त्रयी विद्यांमध्ये प्रवेश करते झाले आणि त्यांनी स्वत:ला झाकून घेतले, आच्छादित केले. त्यामुळे वेदातील मंत्रांना (छंदत्व) आहे. परंतु त्यामुळे देवांची मृत्युवश्यता निवृत्त झाली नाही. मृत्युपासून ते लपू शकले नाही. मृत्यूने त्यांना ऋचांमध्ये सामांमध्ये, यजूंमध्ये पाहिले, जसे कोळी पाण्यात माशांना पाहू शकतो तसे!
तेव्हा हे देव मृत्युचा आशय जाणून त्रिवेदातील कर्मापासून व्यावृत्त होऊन स्वरामध्ये (ओंकारामध्ये) प्रविष्ट झाले. म्हणूनच कर्म सोडून ओंकारोपासना करू लागले.

यदा वा ऋचम् आप्नोति ---------- अभया अभवन्।
जेव्हा ऋचेला स्वाधीन करून घेतो तेव्हा ॐ असेच मोठ्याने उच्चारण करतो. तसेच साम व यजुर्मंत्र म्हणताना ॐ चे उच्चारण करतो. हा स्वर, हे अक्षर अमृत व अभय आहे. त्यात प्रवेश करून म्हणजे ब्रह्मबुद्धीने त्याचे ध्यान करून देव उपास्य गुणाच्या अनुसार अमृत व अभय झाले.

© www.madhavberaghuveer.com

परंतु केवळ देवच अमर होतात असे नाही तर--

स य एतदेवं विद्वान् अक्षरं प्रणौति
एतदेव अक्षरं स्वरम् अमृतम्
अभयं प्रविशति तत्प्रविश्य यदमृता
देवाः तद् अमृतो भवति ॥५॥

जो कोणी दुसराही देवांप्रमाणेच या अमृत अभय गुणविशिष्ट अक्षरास जाणणारा, त्याची उपासना, स्तुति करतो, तो याच अमृत, अभय स्वरात प्रवेश करतो. त्यात प्रवेश करून ज्या अमृतत्वाने देव अमृत झाले. त्या अमृताने युक्त होतो.

शुष्मप - शुध्द प्रतिपदेला (प्रत्येक महिन्याच्या) उपासना केली जाते. गरम अन्नसेवन करतात. वासाने तृप्त होतात.

साध्यदेव - तामस मन्वंतरातील देवांना साध्यदेव म्हणतात. हे मूळ देव नव्हेत त्यांनी शुभकर्मांनी देवत्व प्राप्त केले.

विश्वेदेव - आविक्षितस्य कामप्रे विश्वेदेवा सभासदयति। ऋग्वेदातील एका यज्ञिय देवसमूहाला विश्वेदेव म्हणतात. किंवा विश्वेदेव म्हणजे सर्व देव असाही अर्थ आहे.

आपलाही प्रवास देवत्वाकडे पोहोचण्यासाठी हवा. पाणी पाण्यात, तेल तेलात मिसळते तसेच त्यांच्याशी एकरूप होण्यासाठी त्यांचे गुण Acquire करायला हवे. असा प्रयत्न केला तर देव नाही तरी निदान देवमाणूस तरी होता येईल.

© www.madhaveeraghuveer.com

परंतु केवळ देवच अमर होतात असे नाही तर---

स य एतदेवं विद्वान् अक्षरं प्रणौति
एतदेव अक्षरं स्वरम् अमृतम्
अभयं प्रविशति तत्प्रविश्य यदमृता
देवाः तद् अमृतो भवति ॥५॥

जो कोणी दुसराही देवांप्रमाणेच या अमृत अभय गुणविशिष्ट अक्षरास जाणणारा, त्याची उपासना, स्तुति करतो, तो याच अमृत, अभय स्वरात प्रवेश करतो. त्यात प्रवेश करून ज्या अमृतत्वाने देव अमृत झाले. त्या अमृताने युक्त होतो.

ऋभव - शुद्ध प्रतिपदेला (प्रत्येक महिन्याच्या) उपासना केली जाते. गरम अन्नसेवन करतात. वासाने तृप्त होतात.

साध्यदेव - तामस मन्वंतरातील देवांना साध्यदेव म्हणतात. हे मूळ देव नव्हेत त्यांनी शुभकर्मांनी देवत्व प्राप्त केले.

विश्वेदेव - आविक्षितस्य कामप्रे विश्वेदेवा सभासदयति। ऋग्वेदातील एका यज्ञीय देवसमूहाला विश्वेदेव म्हणतात. किंवा विश्वेदेव म्हणजे सर्व देव असाही अर्थ आहे.

आपलाही प्रवास देवत्वाकडे पोहोचण्यासाठी हवा. पाणी पाण्यात, तेल तेलात मिसळते तसेच त्याच्याशी एकरूप होण्यासाठी त्याचे गुण Acquire करायला हवे. असा प्रयत्न केला तर देव नाही तरी निदान देवमाणूस तरी होता येईल.

© www.madhavieeraghuveer.com

१६ जून



पञ्चमः खण्डः (मंत्र-५)

अथ खलु य उद्गीथ ........ इत्येव स्वरन् एति ॥१॥

खरोखर जो उद्गीथ आहे तोच प्रणव आहे. जो प्रणव आहे तोच उद्गीथ आहे. हा आदित्य सतत ॐ चा उच्चार करीतच भ्रमण करत असतो. त्यामुळे आदित्य हा ॐ कारस्वरूप आहे.

ॐ कार व आदित्य या दोन्हींच्या लहरी, स्पंदने माणसाला हितकर असतात.

नासा NASA ने सूर्याच्या भ्रमणाच्या आवाजाची नोंद केली आहे. तो ॐ आहे.

एतमु एवाहम् अभ्यगासिषं तस्मात् मम त्वमेकोऽसीति ह कौषीतकिः पुत्रमुवाच रश्मींस्त्वं पर्यावर्तयात् बहवः वै ते भविष्यन्तीति अधिदैवतम् ॥२॥

कौषीतकी ऋषी आपल्या पुत्राला म्हणाले — यालाच अभिमुख होऊन मी गायन केले आहे. त्याचे मी अभेदाने ध्यान केले (एकरूपता) त्यामुळे तू मला एकच पुत्र आहेस. यास्तव तू मात्र सूर्यकिरणांपासून वेगळे समजून आदित्याची उपासना कर. त्यायोगे जशी एका सूर्याची अनेक किरणे तसे तुला पुष्कळ पुत्र प्राप्त होतील.

असे देवताविषय दर्शन आहे. किंवा ही अधिदैवत उपासना आहे.

अथ अध्यात्मं य एवायं मुख्यः प्राणस्तम् उद्गीथम् उपासीत ओम् इति हि एष स्वरन् एति ।

© www.madhaveeraghuveer.com

आता ओंकाराची आध्यात्मिक उपासना सांगितली आहे. मुख्य प्राणाला उद्गीथ समजून उपासना करावी. कारण प्राणही ओम असेच इंद्रियांना अनुमती देत असतो. ॐ ही प्राणाने सर्व कर्मांना दिलेली अनुमती आहे.

★ एतम् उ एव अभ्यगासिषं तस्मात् मम त्वम् एक असि इति ह
कौषीतकिः पुत्रम् उवाच । प्राणान् बहवः मे भविष्यन्ति
इति भूमानम् अभिगायतात् ।

मी याला अभिमुख होऊन गायन केले म्हणून तू मला एक पुत्र आहेस. तू प्राणास बहुत्वयुक्त - अशा भेदगुणविशिष्ट उद्गीथास उद्देशून मला पुष्कळ पुत्र होतील अशा प्रार्थनेने, भावनेने त्याचे अभिगायन कर.

आधिदैविक उपासनेत सूर्य व त्याची किरणे - या भावनेने
तर आध्यात्मिक " प्राण व आधारित इंद्रिये " "
उपासना करावी. प्रजातन्तु न व्यत्सेदीः । - समावर्तन -

अथ खलु य उद्गीथः स प्रणवो यः प्रणवः स उद्गीथ इति
होतृषदनाद् हि एव अपि दुरुद्गीतम् अपि अनुसमाहरति ॥५॥



जो प्रणव तोच उद्गीथ हे जो जाणतो तो होत्याच्या होत्रकर्मापासून उद्गात्याने आपल्या कर्मात केलेल्या उणीवेचेही अनुसंधान करतो. त्याच्या दोषांचे निवारण करतो.

ऋग्वेदाचा प्रतिनिधि असणाऱ्या होत्याकडून जर कधी मंत्रपठणात चूक झाली तर त्याची ओंकारोपासना त्या दोषाच्या पातकापासून त्याचे रक्षण करते. एवढा ओंकारोपासनेचा महिमा आहे.

©www.madhaveeraghuveer.com

१-६

षष्ठ: खण्ड: (मंत्र-१)

इयमेव ऋक् अग्नि: साम । तत् एतत् एतस्याम् ऋचि अध्यूढम् साम तस्मात् ऋचि अध्यूढम् साम गीयते इयम् एव सा अग्नि: अम: तत् साम ॥१॥

ही पृथ्वीच जणू काही ऋक् आहे आणि साम हा अग्नि आहे. भूमीवर असलेल्या अग्निला भौम म्हणतात. हा साम ऋक्वर आरूढ झाला आहे. (ऋचि अध्यूढम् साम गीयते)

• पृथ्वी व अग्नि हे परस्पर भिन्न नाहीत तसेच ऋक् व साम हेही भिन्न नाहीत. पृथ्वी ही सा तर अग्नि अम आहे दोन्हीचा मिळून साम हा शब्द झाला आहे.

ओंकार व प्रणव हे जसे एकरूपच आहेत. तसे अन्यही गोष्टी एकरूप आहेत. (२) अन्तरिक्ष + वायु (३) द्यु: + आदित्य (४) नक्षत्र + चन्द्रमा (५) शुभ्र + नील

| ऋक् | साम |
|---|---|
| पृथ्वी | अग्नि |
| अन्तरिक्ष | वायु |
| द्युलोक | आदित्य |
| नक्षत्राणि | चन्द्रमा |
| शुभ्र | नील |

[६वा श्लोक पुढे --->

तस्य यथा कप्यासं पुण्डरीकमेवमक्षिणी तस्योदिति नाम स एष । सर्वेभ्य: पाप्मभ्य उदित उदेति ह वै सर्वेभ्य: पाप्मभ्यो य एवं वेद ॥७॥

आदित्याच्या डोळ्यांचे वर्णन करताना ते माकडाच्या बसण्याच्या पृष्ठभागासारखे जे पुंडरीक कमळ आहे त्या रंगाचे याचे दोन्ही डोळे आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

त्या एवंगुणविशिष्ट पुरुषाचे उत असे नाव आहे. स: सर्वेभ्य: पाप्मभ्य: वर गेला आहे - उदित: जो असे जाणतो तो सर्व पापांपासून वर जातोच.

६. अथ यदेवैतद् — — — — — — आप्रणखात् सर्व एव सुवर्ण:) आदित्यामध्ये जो हिरण्मयसा पुरुष दिसतो त्याच्या मिशा, केस सर्व हिरण्मयच आहे. जो नखशिखांत हिरण्मय आहे.

तस्यर्क्च साम च गेष्णौ तस्मादुद्गीथ: तस्मात् तु एव उद्गाता एतस्य हि गाता स: एष: ये च अमुष्मात् पराञ्च: लोका: तेषां चेष्टे देवकामानां च इति अधिदैवतम् ॥८॥ गेष्णौ - पेर / पक्ष

आदित्यामधील जो पुरुष आहे. ऋक् व साम हे त्याचे दोन्ही पक्ष आहेत / पेरं आहेत. तो देव सर्वात्मा आहे व त्याला परात्पर लोकातील कामाचे ईशित्व आहे. म्हणून तो उद्गीथ आहे त्यामुळेच तो उद्गाता (गाणारा) आहे.
तो हा उत नामक देव व जे आदित्याहून ऊर्ध्वलोक आहेत त्यांचे तो ईशन व धारण करतो.
हीच उद्गीथाची आधिदैविक उपासना आहे.

१८ जून



अध्याय १, खण्ड - ७

सप्तम: खण्ड: (मंत्र - ८)

अथाध्यात्मं वागेवर्क्प्राण: साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढं साम तस्मादृच्यध्यूढं साम गीयते। वागेव सा प्राणोऽमस्तत्साम ॥१॥

आपली वाणीच ऋक आहे, व प्राण साम आहे. वाणिवर साम आरूढ होतो म्हणूनच ऋचेवर साम आरूढ होतो. त्याचे गायन केले जाते. वाक् - सा आणि प्राण - अम, अशा रीतीने साम शब्द बनला आहे.

तसेच चक्षु न आत्मा - चक्षु - ऋक् - सा आहे तर आत्मा - अम आहे. दोन्ही मिळून साम आहे. ॥२॥ (ज्याच्या डोळ्यात आत्मा असतो.)

श्रोत्र न मन - श्रोत्र - कान - मन - सा आणि मन - अम - साम आहे. ॥३॥

अथ यदेतदक्ष्ण: शुक्लं भा ------- कृष्णं तत्पमस्तत्साम ॥४॥

डोळ्यांचे जे शुभ्र तेज आहे तो ऋक आहे. निळसर, काळसर जो भाग तो साम आहे. शुभ्रावर काळसर भाग म्हणूनच ऋक्वर साम आधिष्ठित आहे. म्हणूनच ऋक्वर आधारित सामाचे गायन केले जाते.

अथ यः एषोऽन्तरक्षिणि --------- यजुस्तद् ब्रह्म ॥५॥

आता या डोळ्यांच्या आत जो पुरुष दिसतो तोच ऋक् आहे, तोच साम आहे, तोच उक्थ (मूळ कारण) तोच यजु,



©www.madhaveeraghuveer.com

FEBRUARY
7
THURSDAY

पौष कृ. १२ संवत २०६९
गुरुवार ७/२/२०१३

TDS payment of Jan.

JANUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

आहे, तोच साम आहे, तोच ब्रह्म आहे. आदित्यामधील पुरुषाचे जे रूप आहे, तेच या डोळ्यांतील पुरुषाचे ही रूप आहे. जे त्याचे पक्ष (पेरे) आहेत तेच याचेही पक्ष (पेरे) आहेत. जे त्याचे नाव तेच याचेही नाव आहे.

आदित्यामधील पुरुष व नेत्रामधील पुरुष एकरूपच आहेत. ही एकरूपता ध्यानात घेऊनच आधिदैविक व आध्यात्मिक उपासना करायची असते.

स एष ये चैतस्मादर्वाञ्चो लोकास्तेषां चेष्टे मनुष्यकामानां चेति तद्य इमे वीणायां गायन्त्येतं ते गायन्ति तस्मात्ते धनसनयः ॥ ६॥

अर्वाक् - अलीकडचे
पराक् - पलीकडचे.

तो हा (डोळ्यामधील चाक्षुपुरुष) व जे या (अध्यात्म आत्म्याच्या) खालचे लोक आहेत. त्यांचे, तसेच मानवी इच्छांचे नियंत्रण करतो. त्यामुळे जे लोक वीणेवर गायन करतात, ते त्याचेच गायन करतात. त्याचे फळ म्हणून ते गाणारे धनवान होतात.

अथ य एतदेवं विद्वान्साम ------- देवकामांश्च ।

तो अशा प्रकारे (चाक्षुष पुरुष व आदित्य पुरुषाची एकता) जाणून साम गातो तो त्या दोघांचे ही गान करत असतो, आणि याचे फलस्वरूप म्हणून या गायनाद्वारा आदित्य लोकांच्याही वरचे लोक व देवतांचे भोग प्राप्त करतो.
आध्यात्मिक व आधिदैविक उपासना ही एकाच तत्त्वाची उपासना आहे. अशा उपासकाला दैवी भोग प्राप्त होतात.

© www.madhaveeraghuveer.com

MARCH 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

पौष कृ. १३ संवत २०६९
शुक्रवार ८/२/२०१३

FEBRUARY
8
FRIDAY

अथ अनेनैव ये चैतस्मादर्वाञ्चो लोकांस्तांश्च आप्नोति मनुष्यकामांश्च तस्माद उ ह एवंविद उद्गाता ब्रूयात ॥८॥

कं ते काममागायानीत्येष ह्येव कामागानस्य इष्टे य एवं विद्वान्साम गायति साम गायति ॥९॥

त्याचप्रमाणे तो याद्वारा याच्या खालचे (अलीकडले) जे लोक आहेत त्यांना मनुष्यसंबंधी कामनांच्या पूर्तीला प्राप्त करतो. जो या प्रकारे जाणकार आहे तो उद्गाता (यजमानांना) विचारतो " मी तुझ्या कोणत्या इष्ट कामाचे आगान करू?" किंवा त्याने असे विचारावे. कारण तो उद्गाता कामाचे आगान करण्यास समर्थ आहे. अशा प्रकारे जो असे खऱ्या अर्थाने जाणतो तो जर सामगायन करत असेल तर तेच खरे सामगायन!

© www.madhaveeraghuveer.com

१८ जून २०१९

॥श्री॥

FEBRUARY
9
SATURDAY

पौष कृ. १४ संवत २०६९
शनिवार ९/२/२०१३

अध्याय - १ खंड - ८

JANUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

अष्टम: खण्ड: । (मंत्र - ८)

त्रयो ह उद्गीथे कुशला बभूवु: । शिलक: शालवत्य: चैकितायन: दाल्भ्य: प्रवाहण: जैवलि: इति । ते ह ऊचु: उद्गीथे वै कुशला: स्म: । हन्त उद्गीथे कथां वदाम: इति ।

शालवानाचा मुलगा शिलक, चिकितायनाचा पुत्र दाल्भ्य व जीवलाचा मुलगा प्रवाहण हे तिघेजण उद्गीथामध्ये नैपुण्य प्राप्त केलेले होते. ते एकत्र येऊन म्हणाले. आपण उद्गीथात कुशल आहोत तर त्यावर काही चर्चा करूया.

अशा चर्चांमधून चुकीच्या समजुती, त्रुटी दूर होत असत व उत्तम विचारांची देवाणघेवाण होत असे. अशा चर्चांचा ज्ञानोपासनेसाठी चांगला उपयोग होत असे.

तथा इति ह समुपविविशु: स ह प्रवाहणो जैवलि: उवाच भगवन्तौ अग्रे वदताम् । ब्राह्मणयो: वदतो: वाचं श्रोष्यामि इति ।

तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून ते बसले. तो प्रवाहण जैवलि म्हणाला,

SUNDAY, FEBRUARY 10 पौष अमावास्या संवत २०६९

आपण दोघे पूज्यच आगोदर बोला. मी तुम्हा बोलणाऱ्या दोघा ब्राह्मणांची वाणी ऐकेन.
जैवलि हा क्षत्रिय (राजा) होता. तो स्वतः ज्ञानी असुनही विनयशील आहे त्यामुळे त्याने प्रथम बोलण्याचा मान ब्राह्मणांना दिला.

© www.madhaveeraghuveer.com

MARCH 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

माघ शु. १ संवत २०६९
सोमवार ११/२/२०१३

FEBRUARY 11 MONDAY

स ह शिलकः शालावत्यश्चैकितायनं दाल्भ्यं उवाच – हन्त, त्वा पृच्छानि इति पृच्छ इति ह (दाल्भ्य) उवाच।

प्रवाहणाचे हे बोलणे ऐकून शिलक दाल्भ्याला म्हणाला – अरे, (तुझी संमती असेल तर) मी तुला काही विचारु का? तेव्हा दाल्भ्य म्हणाला – विचार!

का साम्नो गति ———————— इति ह उवाच।

शिलकाने विचारले – सामाची गति काय आहे? म्हणजेच साम कशावर आधारित आहे? अवलंबून आहे?
दाल्भ्य म्हणाला – साम स्वरावर आश्रित आहे.
शिलक — स्वराचा आधार काय?
दा. प्राण हा स्वराचा आधार आहे.
शिलक - प्राणाचा आधार काय?
अन्न हा प्राणाचा आधार आहे.
शिलक - अन्नाचा आधार काय?
आप/जल हा अन्नाचा आधार आहे.
कारण अन्न प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यासाठी पाण्याची आवश्यकता आहेच.
शेती, शिजवणे, पचणे.
पुढे शिलकाने विचारले —
शिलक - पाण्याला कशाचा आधार?
दाल्भ्य - जो दूर असणारा स्वर्गलोक किंवा द्युलोक!
शिलक - त्या लोकाचा आधार काय?
दाल्भ्य - आम्ही साम हा स्वर्गीय प्रतिष्ठित आहे असे मानतो, स्वर्गलोकाला ओलांडून कुणी सामाला

© www.madhaveeraghuveer.com

अन्यत्र नेऊ शकत नाही. साम म्हणजेच स्वर्ग आणि स्वर्ग म्हणजेच साम अशी त्याची स्तुति केली जाते.

यावर (ह्या मंत्रात) शिलक दाल्भ्याला म्हणाला — अरे दाल्भ्य, खरोखर हा तुझा साम निश्चितच अप्रतिष्ठित आहे रे! हे एखाद्या सामवेत्त्याने ऐकले तर 'तुझे मस्तक तुटून जमिनीवर पडू दे' असे म्हणेल, आणि खरोखरच तुझे मस्तक तुटून जमिनीवर पडेल.

हन्त अहम् एतत् भगवतः वेदानि इति ह (दाल्भ्यः) उवाच
विद्धि इति ह शिलकः उवाच ------ हि साम
॥७॥

आता यावर दाल्भ्याने उत्तर विचारले---
मग (स्वर्गलोक कशावर प्रतिष्ठित आहे) ही गोष्ट मी आपणाकडून जाणून घेऊ इच्छितो.
त्यावर शिलक म्हणाला — नक्कीच जाणून घे.
दाल्भ्य — हा स्वर्गलोक कशावर आधारित आहे.
शिलक — या लोकावर स्वर्गलोक आधारित आहे.
दाल्भ्य — मग या लोकाची गति काय?
शिलक — या प्रतिष्ठारूप लोकाला ओलांडून सामाला कोणीही नेऊ नये. या प्रतिष्ठाभूत लोकावर आम्ही सामाला संस्थापित करतो. सामाचे प्रतिष्ठा म्हणून स्तवन केले जाते. हा भूलोक हीच सामाची प्रतिष्ठा आहे. हा मर्त्यलोक दान, यज्ञ इ० द्वारा स्वर्गलोकाचे पोषण करतो. म्हणून स्वर्ग हा या मृत्युलोकावर आधारित आहे. सर्वांचा आधार ही पृथ्वीच आहे. तेव्हा सामाचाही आधार पृथ्वीच आहे ही पृथ्वी रथंतर साम आहे - श्रुति — शंकराचार्य.

©www.madhaveeraghuveer.com

ते ह प्रवहणो जैवालि - - - - - - - विद्धीति ह उवाच ॥८॥

त्या शालवानाच्या पुत्राला - शिलकाला जीवलाचा पुत्र प्रवाहण म्हणाला, अरे शालावत्य, तुझा साम तर अंतवत् म्हणजे नश्वर आहे. एखादा सामज्ञानी म्हणायचा - तुला साम कळला नसताना कवल्याचा आव आणतोस, तुझे डोके तुटून जमिनीवर पडेल, आणि खरंच त्याने जर असे म्हटले तर तुझे मस्तक खरंच जमिनीवर पडेल की! त्यावर शिलक म्हणाला, "(म्हणूनच) मी हे तुमच्याकडून जाणून घेऊ इच्छितो.

प्रवाहण म्हणाला — जाणून घे. मी सांगतो.

१.९

नवमः खण्डः (मंत्र-१)

अस्य लोकस्य का गतिः इति आकाश इति ह उवाच सर्वाणि ह वा इमानि भूतानि आकाशाद् एव समुत्पद्यन्ते आकाशं प्रत्यस्तं यन्त्याकाशो हि एभ्यः ज्यायान् । आकाशः परायणम् ॥१॥

मग शिलकाने विचारले, या लोकाचा आधार काय? तेव्हा प्रवाहण म्हणाला - आकाश या " " आहे. ही सर्व भूते या आकाशापासूनच निर्माण झाली आहेत. व ती त्यातच लय पावतात. या सर्वांहून आकाशच श्रेष्ठ व ज्येष्ठ आहे. आकाश हे सर्वांचे गंतव्य स्थान आहे. सर्वांचा प्रवास आकाशापासून सुरु होतो व आकाशापर्यंत पोहोचतो.

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

स एष परोवरीयान् उद्गीथः स एषः अनन्तः परोवरीयः ह अस्य भवति परोवरीयसः ह लोकान् जयाति यः एतत् एव विद्वान परोवरीयांसमुद्गीथम् उपास्ते ॥२॥

तो हा उद्गीथ श्रेष्ठाहून श्रेष्ठ आहे. तो अनंत आहे जो हे सर्व जाणून उद्गीथाची उपासना करतो तो स्वतः श्रेष्ठाहून श्रेष्ठ होतो व तो श्रेष्ठतम लोकांना प्राप्त करतो. सर्वश्रेष्ठ उद्गीथाची उपासना माणसाला सर्वश्रेष्ठ बनवते.

तं ह एतम् अतिधन्वा ------- जीवनं भविष्यति ॥३॥
हेभ्यः - लौकिक जीवनासाठी.

त्या या उद्गीथाला जाणणारा अतिधन्वा नावाच्या शुनकपुत्र उदरशांडिल्य या नावाच्या शिष्याला हे उद्गीथदर्शन सांगून म्हणाला. जोवर तुझ्या संततीमध्ये या उद्गीथाला जाणतील तोवर त्यांचे या लोकी प्रसिद्ध लोकजीवनाहून उत्तरोत्तर विशिष्टतर जीवन होईल.

तथा अमुष्मिन् लोके -------- इति लोके लोक इति ॥४॥
(परलोकात)

तसेच परलोकातही सुद्धा त्याला उत्कृष्टातील उत्कृष्ट लोक प्राप्त होतो. जो हे सर्व जाणून उद्गीथाची उपासना करतो त्याचे जीवन या लोकी उत्कृष्टाहून उत्कृष्ट होते. व परलोकात देखील उत्कृष्टाहून उत्कृष्ट लोकांची त्याला प्राप्ति होते.

उद्गीथाच्या उपासनेने लौकिक व पारलौकिक जीवन उत्तम रीतीने व्यतीत होते हे प्रकरणाने अन्यांचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे.

©www.madhuraveeraghuveer.com

दशमः खण्डः (मंत्र-११)

मटचीहतेषु कुरुषु आटिक्या सह जायया उषस्तिर्ह चाक्रायण इभ्यग्रामे प्रद्राणक उवास ॥१॥

कुरुदेशातील धान्याची शेते मटची (अशनी, गारा, वीजा) किंवा पाषाणाच्या वृष्टीने नाश पावली असता आपल्या अल्पवयीन भार्येसहित चक्राचा पुत्र उषस्ति हत्तीला योग्य (इभ्य) असलेल्या ईश्वराच्या किंवा महंताच्या गावात अत्यंत कुत्सित (अन्त्य) अवस्थेस प्राप्त होऊन काही दिवसांपुरता रहात होता.

स ह इभ्यं कुल्माषान् खादन्तं बिभिक्षे तं होवाच। नेतोऽन्ये विद्यन्ते यच्च ये म इम उपनिहिता इति ॥२॥

इभ - हत्ती इभ्य - माहूत Rich Person.

उषस्तिला बरेच दिवस काही खायला मिळाले नव्हते. तेव्हा तो चाक्रायण कुत्सित माषास - अर्धे शिजवलेले यव - हुलगे खात असलेल्या इभ्याकडे (माहूताकडे) जाऊन त्याच्याकडे याचना करता झाला. तेव्हा तो माहूत त्याला म्हणाला याहून दुसरे (हुलगे / धान्य) माझ्याकडे नाही. आणि जेवढे माझ्याकडे होते ते सगळे या वाडग्यात (पात्रात) आहेत.

एतेषां मे देहीति होवाच तानस्मै प्रददौ हन्तानुपानमित्युच्छिष्टं वै मे पीतं स्यादिति होवाच ॥३॥

तेच मला दे असे उषस्ति बोलला. तेव्हा इभ्याने ते त्याला दिले आणि (हन्त) तू जर कुल्माष (हुलगे) खाल्ले आहेस तर हे (अनुपानासाठी) पाणी पिण्यास घे. असे म्हणाला तेव्हा उषस्ति म्हणाला: हे उष्टे आहे. ते पाणी मी

FEBRUARY
16
SATURDAY

माघ शु. ६ संवत २०६९
शनिवार १६/२/२०१३

| JANUARY 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

घेतल्यास मी उष्टे पाणी प्यायले असे होईल.

न स्विदेतेऽप्युच्छिष्टा इति न वा अजीविष्यमिमान् खादन् इति होवाच कामो म उदकपानम् इति॥४॥

हे कुल्माषही उष्टे नाहीत का? असे तो इभ्य बोलला असता उषस्ति म्हणाला - (न वा अजीविष्यम्) मी हे कुळथी खाल्ले नसते तर जिवंत राहिलो नसतो. (मे उदकपानं कामः इति) पाणी काय मला वाटेल तेव्हा मिळेल. ते कुळथी न खाता मी जिवंत राहू शकलो नसतो. पाणी पाहिजे तेव्हा मिळू शकते. तेव्हा पाण्याच्या बाबतीत मी नियम मोडणे योग्य नाही.
जिवंत राहणे हे मुख्य आहे. त्यासाठी नियमांना मुरड घालावी लागली तर अवश्य घालावी पण जीवनरक्षण झाल्यावरही नियम न पाळणे दोषास्पद आहे.

स ह खादित्वा अतिशेषान् जायाया आजहार सा अग्र एव सुभिक्षा बभूव तान् प्रतिगृह्य निदधौ॥५॥

SUNDAY, FEBRUARY 17
माघ शु. ७ संवत २०६९

उषस्तीने ते कुळथी खाऊन उरलेले भार्येसाठी आणले, पण ती अगोदरच सुभिक्षा (पोटभर भिक्षा मिळालेली) झाली होती. म्हणून तिने ते कुळथी पतीकडून घेऊन जपून ठेवले. (निदधौ)

स ह प्रातः संजिहान उवाच यत् बत अन्नस्य लभेमहि लभेमहि धनमात्रान् राजासौ यक्ष्यते स मा सर्वै आर्त्विज्यैः वृणीत इति ॥६॥

तो उषस्ति पहाटे जेव्हा निद्रेचा त्याग करून उठला तेव्हा आपल्या पत्नीला म्हणाला, अरेरे! मला काही अन्न मिळाले तर मी धन प्राप्त करू शकलो असतो. कारण इथे जवळच हा राजा स्वतःसाठी यज्ञ करतो आहे. तो मला सर्व ऋत्विक कार्यासाठी वरेल.

तं जाया उवाच हन्त पत एव इम कुल्माषाः तान् खादित्वा अमुं यज्ञं विततम् एयाय ॥७॥

जाया पतीला म्हणाली असे जर असेल तर हे पते, तुम्ही काल दिलेले हे कुल्माष-कुळीथ मी जपून ठेवले होते. ते खाऊन घ्या. ते खाऊन तो जवळच चाललेल्या यज्ञाला (ऋत्विजांकडून विस्तारलेल्या) गेला.
यज्ञाचा विस्तार म्हणजे साग्रसंगीत केला जाणारा यज्ञ! विधिवत्– ५ अंगे – शास्त्र, मंत्र, दक्षिणा, अन्नदान, श्रद्धा!

तत्र उद्गातॄन् आस्तावे स्तोष्यमाणान् उपोपविवेश स ह प्रस्तोतारम् उवाच ॥८॥

तो उषस्ति तिथे जाऊन बसला. (आस्तावे स्तोष्यमाणान् उद्गातृन्) ज्यात स्तुति करतात त्या आस्ताव स्थानाच्या समीप बसला. व त्या प्रस्तोत्यास (प्रस्ताव मंत्र म्हणणाऱ्यास) म्हणाला —

© www.madhaveeraghuveer.com

प्रस्तोतर्या देवता प्रस्तावमन्वायत्ता तां चेद
अविद्वान प्रस्तोष्यासि मूर्धा ते विपतिष्यतीति ॥८॥

हे प्रस्तोता, ज्या देवतेच्या आस्ताव तू म्हणतो आहेस, जी देवता प्रस्ताव भक्तीमध्ये अनुगत आहे त्या देवतेला तू अविद्वान (न जाणताच) तू प्रस्तवन करशील तर तुझे मस्तक तुटून खाली पडेल.

अर्थ न जाणताच घोकंपट्टी जर तू माझ्यासारख्या जाणकारासमोर करणार असशील तर त्याचा परिणाम म्हणून तुझे मस्तक धडावेगळे होईल.

मंत्र नेहमी अर्थ जाणून, ज्या देवासाठी ते मंत्र आहेत त्या देवाची माहिती मिळवून मग गावेत.

एवमेवोद्गातारमुवाच ------ ते विपतिष्यतीति ॥ १०
एवमेव प्रतिहर्तार ------ समारतास्तुष्णीमासांचक्रिरे ॥ ((११))

असेच तो (उषस्ति) उद्गात्याला म्हणाला. तसेच तो प्रतिहर्त्याला सुद्धा म्हणाला., हे प्रतिहर्त्या, जी देवता प्रतिहारामृत अन्वायत्त-अनुगत आहे तिला न जाणणारा असा तू प्रतिहरण करशील तर तुझे शिर पडेल.

तेव्हा ते प्रस्तोत्रादिक कर्मापासून उपरत-शांत होऊन देवताज्ञानाच्या इच्छेने शांत बसले.

त्यांना त्या देवतांबद्दल काहीच माहिती नव्हती. ते मंत्र नेमके का म्हणायचे हे ठाऊक नव्हते. आणि असेच न समजता आपण मंत्र म्हणत राहिलो तर मस्तक तुटून खाली पडेल. आणि मरणापुढे कोणे शरण जाणार नाही म्हणून ते सर्व गप्प बसले.

© www.madhaveeraghuveer.com

एकादशः खण्डः (मंत्र-१)

अथ ह एनं यजमान उवाच भगवन्तं वा अहं विविदिषाणि। इति चाक्रायण उषस्ति अस्मि इति ह उवाच॥१॥

प्रस्तोतृप्रभृति मुकाट्याने बसलेले पाहून यजमान म्हणजेच यज्ञ करणारा राजा म्हणाला, "पूजनीय असे आपल्याला जाणण्याची मी इच्छा करतो. असे बोलले गेलेला तो म्हणाला, तुमच्याही कानावर आलो असेन तर मी चाक्रायण उषस्ति आहे.

स ह उवाच भगवन्तं अहम् एभिः सर्वैः आर्त्विज्यैः पर्यैषिषं भगवतो वा अहम् अवित्या अन्यान् अवृषि॥२॥

राजा (यजमान) म्हणाला, या सर्व ऋत्विक कर्मांसाठी, यज्ञ कार्यासाठी मी आपलाच शोध घेत होतो. परंतु आपला लाभ न झाल्यामुळे मी अन्य ऋत्विजांना निवडले.
अवित्य-अव+इ = न मिळाल्याने। त्यांची नियुक्ती केली.

भगवांस्त्वेव मे सर्वैः आर्त्विज्यैः इति। तथा इति। अथ तर्हि एते एव समतिसृष्टाः स्तुवतां यावत् तु एभ्यो धनं दद्याः तावत् मम दद्याः इति। तथा इति ह यजमानः उवाच॥३॥

तर मग आपणच माझ्या सर्व ऋत्विक कार्यासाठी असावे. असे राजाकडून बोलला गेलेला तो उषस्ति ठीक आहे असे म्हणाला. आता हे सर्व ऋत्विज माझ्याकडून प्रसन्नपणे आज्ञा घेऊन कार्य करोत. जेवढे धन तुम्ही यांना द्याल तेवढेच मला तुम्ही द्या. तेव्हा राजा म्हणाला - ठीक आहे.
उषस्ति - निर्लोभी, निगर्वी, उदार होता. त्याचा हा मोठेपणा त्याची विद्वत्ता अधिकच उजळते.

With Best Compliments From

२० जून २०१९

FEBRUARY
21
THURSDAY

माघ शु. ११ संवत २०६९
गुरुवार २१/२/२०१३

MVAT for Jan.
ESI Payment

| JANUARY 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

अथ हैनं प्रस्तोतोपससाद प्रस्तोतर्या देवता प्रस्तावम् अन्वायत्ता तां चेद् अविद्वान् प्रस्तोष्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति मा भगवान् अवोचत् कतमा सा देवता इति ॥४॥

इतके झाल्यानंतर प्रस्तोता उषस्तिस उपसन्न झाला. (उषस्तिकडे गेला) (विनयाने, शिष्यत्वाच्या नात्याने) व त्याला म्हणाला, "ज्या देवतेची स्तुती केली जात आहे तिला न जाणता जर मंत्र म्हणशील तर तुझे मस्तक खाली पडेल – असे तू मला म्हणाला होतास. तर ती देवता कोणती ?"

प्राण इति ह उवाच सर्वाणि ह वा इमानि भूतानि प्राणम् एव अभिसंविशन्ति प्राणम् अभ्युज्जिहते। सा एषा देवता प्रस्तावम् अन्वायत्ता तां चेद् अविद्वान् प्रास्तोष्यः मूर्धा ते व्यपतिष्यत् तथा उक्तस्य मया इति ॥५॥

असे विचारले गेलेला उषस्ति म्हणाला – प्राण! ही सर्व भूते प्राणाला अभिलक्षित करूनच प्राणरूपानेच लीन होतात. उत्पत्तिकाली प्राणापासूनच उद्भवतात. ती ही देवता प्रस्तावाप्रत अनुगत आहे आणि त्या देवतेला न जाणता जर तू प्रस्तोत्याचे कर्म केले असतेस तर मी म्हटल्याप्रमाणे तुझे मस्तक खाली पडले असते. बर झालं तू म्हणायचा थांबलास ते ! Thank God you have stopped chanting !

© www.madhaveeraghuveer.com

अथ ह एनम् उद्गाता उपससाद। उद्गातः या देवता उद्गीथम् अन्वायत्ता तां चेद् अविद्वान् उद्गास्यसि मूर्धा ते विपतिष्यति इति मा भगवान् अवोचत् कतमा सा देवता इति ॥६॥

मग उद्गाता त्याच्याकडे नम्रतेने आला व म्हणाला जी देवता उद्गीथात अनुगत आहे तिला न जाणता जर तू उद्गान करशील तर तुझी मूर्धा पडेल, असे तू म्हणाला होतास. तेव्हा ती देवता कोणती?

आदित्य इति ह उवाच सर्वाणि ह वा इमानि भूतानि आदित्यम् उच्चैः सन्तं गायन्ति सा एषा देवता उद्गीथम् अन्वायत्ता तां चेद् अविद्वान् उदगास्यः मूर्धा ते व्यपतिष्यत् तथा उक्तस्य मया इति ॥७॥

उषस्ति म्हणाला, आदित्य ही उद्गीथाची देवता आहे, येथील सर्व भूते म्हणजेच निर्माण झालेले सर्वच, उंच असणाऱ्या आदित्याची स्तुति गातात. हाच आदित्य देव उद्गीथामध्ये अनुगत आहे. जर तू हे न जाणताच उद्गान केले असतेस तर मी म्हटल्याप्रमाणे तुझे मस्तक जमिनीवर पडले असते.

अथ हैनं प्रतिहर्तोपससाद, ———— तथोक्तस्य मयेति ॥८॥

अशाच प्रकारे प्रतिहर्त्याने प्रतिहाराची देवता कोणती असे विचारले असता 'अन्न' असे सांगितले. या भूमिवरील सर्व भूते अन्नाचे सेवन करूनच जिवंत राहतात.



© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

☆ वैदिक यज्ञोपासनेत देवोपासक यजमानाच्या जोडीला वेदामध्ये निष्णात व यज्ञकर्मकुशल पुरोहितही असावे लागतात. उषस्ति चाक्रायण हा असाच जाणकार ज्ञानी यज्ञकर्मकुशल विद्वान होता. त्याचा तेवढा अधिकार होता आणि म्हणूनच यज्ञकर्मात कोठेही चूक होऊ नये यासाठी तो दक्ष होता. त्यामुळे प्रस्तोता, उद्गाता व प्रतिहर्ता यांनी देवतेला न जाणता मंत्र म्हणणे त्याला मान्य नव्हते. म्हणून त्याने सौम्य शब्दात त्यांची कानउघाडणी केली.

प्राण म्हणजे चेतना! हे अध्यात्माचे प्रतीक आहे.
प्रस्तोत्याने ते जाणून घेणे आवश्यक होते.

आदित्य - म्हणजे प्रकाश! हे अधिदैवताचे प्रतीक आहे.
उद्गात्याने ते न जाणता मंत्र म्हणणे हे चूक आहे.

अन्न - हा जीवनाचा आधार आहे. ते आधिभूताचे प्रतीक आहे
ही प्रतिहर्ताची देवता आहे.

या तिन्हींवर मानवाची उन्नती अवलंबून आहे. धर्म मार्गाने अन्न व विषयभोग मिळवावे. ते संयमाने व इतरांबरोबर वाटून घेऊन भोगावेत. ही अन्नाची उपासना आहे तर निःस्वार्थी शुद्ध परोपकारी सदाचारी वर्तन ठेवणे ही



प्राणाची उपासना आहे तर भजन-पूजन इ. उच्च गोष्टींचा ध्यास घेणे ही आदित्याची उपासना आहे. यामुळे जीवनाला डौल प्राप्त होतो.

मात्र ज्या माणसाला पोटभर अन्न मिळत नाही, स्वस्थ बसण्याची सोय नाही आणि धड हवापाणी प्रकाश मिळत नाही त्याला आत्मज्ञानाच्या गोष्टी सांगणे अनुचित आहे म्हणून प्रत्येक संत आपल्याकडे येणाऱ्या माणसाला प्रथम आश्रय देतात, नंतर पोटभर खायला देतात आणि मगच परमार्थाच्या गोष्टी सांगतात. (संत-आश्रमात हवा पाणी उत्तम असते)

दुसऱ्या अध्यायात २४ खंड आहेत.



।।श्री।।

१.१२

अध्याय पहिला

।।द्वादशः खण्डः।। (मंत्र १)

अथातः शौव उद्गीथस्तद् ह बको दाल्भ्यो ग्लावो वा मैत्रेयः स्वाध्यायम् उद्वव्राज ।।१।।

हे उद्गीथ शौव उद्गीथ म्हणून ओळखले जाते. कारण यात्या द्रष्टा श्वान आहे.

उद्वव्राज हे एकवचनी क्रियापद आहे. त्यामुळे जरी बकाचा मुलगा, दल्भाचा मुलगा किंवा मित्राचा मुलगा असा निर्देश केला असला तरी व्यक्ती एकच आहे. असा तो ग्लाव स्वाध्यायासाठी जलाशयाजवळ गेला. किंवा गावाबाहेर गेला. [किंवा अन्नाचा लाभ अपेक्षित असल्याने शौव उद्गीथ आरंभला जातो.] व तिथे तप करू लागला.

इथे एक जन्मपिता व दुसरा धर्मपिता असण्याची शक्यता आहे. किंवा कोणीस अनादर टाळण्यासाठी अनेक पित्यांचा उल्लेख असेल.

मात्र चाक्रायण उषस्तिवर जशी उष्टे, शिळे अन्न खाण्याची पाळी आली होती तशी येऊ नये म्हणून हे शौन उद्गीथ सांगितले आहे.

तस्मै श्वा श्वेतः प्रादुर्बभूव तमन्ये श्वान उपसमेत्योचुः । भगवान नः अन्नं आगायतु अशनायामः इति ।।२।।

त्याच्यावर कृपा करण्यासाठी त्याच्याजवळ अचानक एक कुत्रा प्रगटला (आधी तिथे नव्हता) बाकीचे कुत्रे त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणाले. भगवान आमच्यासाठी आगानाने अन्न संपादन करो. आम्ही बुभुक्षित आहोत. तुमच्या प्रार्थनेत तेवढी ताकद आहे की लगेच अन्न प्रगट होईल.

© www.madhavaveeraghuveer.com

FEBRUARY
26
TUESDAY

माघ कृ. १ संवत २०६९
मंगळवार २६/२/२०१३

JANUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

श्रीमद् शंकराचार्य — श्वेत कुत्रा म्हणजे मुख्य प्राण आणि इतर कुत्रे म्हणजे श्रोत्र, चक्षु, वाणी इ०

तान् ह उवाच, "इहैव मा प्रातःउपसमीयात इति। तत् ह बकः दाल्भ्यः ग्लावो वा मैत्रेयः प्रतिपालयांचकार ॥३॥

त्या क्षुद्र श्वानांस श्वेत श्वान म्हणाला, प्रातःकाळी याच प्रदेशी मजपाशी तुम्ही या. (हे ऐकून) बक, दाल्भ्य, ग्लाव, मैत्रेय निश्चल त्यांची प्रतीक्षा करत राहिला. उद्या काय घडणार याविषयी त्याला उत्सुकता होती. कारण
श्वेत कुत्र्याचे प्रकट होणे, इतर कुत्र्यांनी त्याला भगवन् म्हणून अन्ननिर्माण करण्याची प्रार्थना करणे, सर्वच गोष्टी आश्चर्यकारक होत्या.

ते ह यथा एव इदं बहिष्पवमानेन स्तोष्यमाणाः संरब्धाः सर्पन्ति इति एव आससृपुः। ते ह समुपविश्य हिं चक्रुः ॥४॥

बहिष्पवमान स्तोत्राचे गान करताना ऋत्विज एकमेकांचे हात धरून गोल गोल फिरतात त्याप्रमाणे त्या कुत्र्यांनी एकमेकांचे शेपूट तोंडात धरून फिरू लागले व नंतर निश्चल बसून हिंकार करू लागले.
आकाशाकडे तोंड करून ओरडू लागले.

ॐ ओ ३ मदा ३ मों ३ पिबा ३ मों ३ देवो वरुणः प्रजापतिः सविता २ न्नमिहा २ ऽऽहरा २ हरो ३ मिति ॥५॥

© www.madhavvairaguveer.com

२३ जून २०१९

MARCH 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

माघ कृ. २ संवत २०६९
बुधवार २७/२/२०१३

FEBRUARY
27
WEDNESDAY

ॐ आम्ही अन्न खातो, ओम् आम्ही पाणी पितो. ओम् देवांनी वरुण, प्रजापति, सविता यांनी इथे अन्न आणून दिले हे अन्नपते, इथे अन्न आणून द्या. अन्न आणून द्या, ओम्।।

येथे गायनासाठी तिनदा ॐकाराचा उच्चार केला आहे. आम्ही भोजन/पान करतो. द्योतनामुळे देव, जगाच्या वर्षणामुळे वरुण, प्रजांच्या पालनामुळे प्रजापति व सर्वांचे प्रसवितृत्व असल्यामुळे, सर्वांना प्रसवणारा आदित्य सविता म्हटला जातो. या पर्यायांनी युक्त असलेला तो आदित्य आमच्यासाठी अन्नाचे आहरण करो.

तो श्वान याप्रमाणे हिंकार करून पुनरपि म्हणाले. तो तू हे अन्नपते, आम्हासाठी या प्राकृत स्थानी तू अन्न घेऊन ये. आहर आहर - द्विरुक्ती समाप्तिसूचक आहे.

## अध्याय १ ला

### त्रयोदशः खण्डः (मंत्रसंख्या - ४)

ॐ अयं वाव लोको हाउकारो। वायु: हाइकार:। चन्द्रमा अथकार:। आत्मा इहकार:। अग्नि: ईकार:॥१॥

सामवेदातील रथंतर सामामध्ये हाउकार स्तोभ आहे. हा मृत्युलोक जणू काही हाउकार, हाइकार म्हणजे वायु अथकार म्हणजे चन्द्रमा, इहकार म्हणजे आत्मा आणि ईकार म्हणजे अग्नि आहे.

उपनिषत्कालीन यज्ञामध्ये सामगायन चालू असताना हाउ हाइ, अथ, हिं इ. आवाज गूढार्थाने वापरत असत.

सामातील मंत्र म्हणजे इहलोक, वायु, चंद्र, आत्मा इ. आहेत अशा भावनेने उपासना करायची. जशी उपासना तसे फळ साधकाला लाभते.

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

आदित्य ऊकारो निहव एकारो विश्वेदेवा औहोयिकार: प्रजापतिर्हिंकार: प्राण: स्वरोऽन्नं या वाग्विराट्॥

आदित्य हा ऊकार आहे. उंच असल्याने आदित्याने उद्गाता उद्गान करतो. निहव किंवा आवाहन हे एकार आहे. विश्वेदेव हे औहोयिकार, प्रजापति हा हिंकार प्राण हा स्वर, अन्न हे या नर वाक् ही विराट आहे.

निहव आवाहन - एकार - एहि(ये) म्हणून बोलावले जाते.

अनिरुक्तस्त्रयोदश: स्तोभ: संचरो हुंकार:॥३॥

अवर्णनीय आणि सर्वत्र संचार करणारा तेरावा स्तोभ हुंकार आहे.
अनिरुक्त (कारणात्मा) कार्यरूपाने अनेकप्रकारे संचार करतो असा हा तेरावा हुंकार स्तोभ हुंकार कारणदृष्ट्या उपास्य आहे.

दुग्धे अस्मै वाग्दोहं य: वाच: दोह: अन्नवान् अन्नादो भवति य: एताम् एवं साम्नाम् उपनिषदं वेद उपनिषदं वेद॥ ॥

सामाचे स्तोभविषयक गूढ जो जाणतो त्याला वाणी, वाणीचे सर्व फल प्राप्त करून देते.
वाणीचे फल म्हणजे वेद, उपनिषदे!
सामाचे गायन करताना जे आलाप येतात ते केव्हा कुठे, कसे घ्यावेत हे सर्व शास्त्राने ठरवले आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

APRIL 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

संकष्ट चतुर्थी

माघ कृ. ४ संवत २०६९
शुक्रवार १/३/२०१३

MARCH
1
FRIDAY

केवळ स्वतःसाठी अन्न व समृद्धी हवी असे वाटणे ही श्वानवृत्ती आहे. गीता म्हणते

ये यजन्त्यात्मकारणात् । स्तेन एव सः ।

अन्न काय किंवा समृद्धी काय सर्वांसाठी मागणे हे सुसंस्कृत माणसाचे लक्षण आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु ----.

दालभ्य व बकाच्या प्रसंगावरून ऋषि हेच सांगत आहेत. 'स्व' ला आणखी व्यापक करणे ही वृत्ती मानवाला महामानव करते आणि त्याही परीघाला ओलांडून जाणाऱ्याला देवमानव Super Human म्हटले जाते. मात्र केवळ मी व माझे या संकुचित वर्तुळात वावरणे म्हणजे श्वानवृत्ती आहे. आज सर्वत्र श्वानांचीच गर्दी झाली आहे. मानव अगदी थोडेच आहेत.

आपण उत्तम मानव होऊ या. केवळ मानवालाच वाणीचे वरदान लाभले आहे. मानवी जीवनात अदृश्याचे ज्ञान करून घेण्यास आणि ते दृश्यामध्ये व्यक्त करण्यास वाणीसारखा मार्ग नाही. एखादा चिंतामणि जसा मनातील इच्छा पुरवतो, तशी वाणी मनात येणाऱ्या अनेक प्रकारच्या शब्दांचे अर्थ व्यक्त करून दाखवते.

☆ वाणीवर प्रभुत्व आल्याने ज्ञान पदरात पडते तर ज्ञान प्राप्त झाल्यावर वाणी ताब्यात येते. म्हणून ज्याची वाणी ताब्यात आहे अशा पुरुषाला ऋषी भाग्यवान म्हणतात. अशी वाणी सिद्ध होते. त्यांचे शाप किंवा वरदान सफळ होतात.

© www.madhaveeraghuveer.com

अध्याय २ - खंड २४

एकूण खंड - २४



॥श्री॥

द्वितीय: अध्याय:।

२.१

प्रथम: खण्ड:। (मंत्र - ४)

ॐ समस्तस्य खलु साम्न उपासनं साधु यत्खलु साधु तत् साम इति आचक्षते। यद् असाधु तद् असाम इति ॥१॥

व्यवहारात जे जे काही साधु असते त्याला साम म्हणतात. किंवा सामाची उपासना फार चांगली असते जे चांगले ते साम व जे चांगले नाही ते असाम।

तद् उत अपि आहुः साम्ना एनम् उपागात् इति। साधुना एनम् उपागात् इति एव तत् आहुः। असाम्ना एनम् उपागात् इति असाधुना एनम् उपागात् इति एव तत् आहुः ॥२॥

साधु व असाधु असा विवेक करण्याचे कारण - सामाने तो या राजाला (सामनाला) प्राप्त झाला म्हणजेच शोभन अभिप्रायाने, शुभभावाने राजाजवळ गेला. किंवा असामाने म्हणजेच अशुभ भावाने, असाधु आशयाने त्याच्याजवळ गेला.
साम व साधु हे समानार्थीनेच योजतात.

अथ उत अपि आहुः ------ बत इति एव तत् आहुः ॥३॥



नंतर अहाहा आमचे साम झाले - चांगले झाले असेही चांगले झाले असते तेव्हा म्हणतात, आणि जेव्हा वाईट होते तेव्हा असाम झाले असेही म्हणतात.

स य एतदेवं विद्वान ------ गच्छेयुरुप च नमेयुः ॥४॥

जो माणूस साम व साधु हे समानार्थी आहेत असे जाणून त्या शुभगुणयुक्त सामाची उपासना करतो त्याच्याकडे

With Best Compliments From

© www.madhaveeraghuveer.com

२८ जून २०१९

APRIL 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

Imp. ✱

माघ कृ. ७ संवत २०६९
सोमवार ४/३/२०१३

MARCH 4 MONDAY

तत्काळ चांगले धर्म येतात व त्याच्यापुढे नम्र होतात, श्रुतिसंमत सर्वच धर्म त्याच्यासमोर उपस्थित होतात.

या खंडामध्ये स्वामींनी एक मूलगामी व महत्त्वाचे तत्त्व सांगितले आहे. साम म्हणजे साधु म्हणजेच चांगले असे जरी असले तरी चांगले काय व वाईट काय हा भेद उरतोच. प्राण्यांना चांगले वाईट कळत नसले तरी माणसाकडे हे समजण्याचा विवेक आहे. परंतु माणसाला जे चांगले वाटते ते खरोखरीच तसे आहे की नाही हे ठरविण्यासाठी तत्त्वज्ञान धडपडत असते.

जे खरोखरच चांगले आहे ते शाश्वत पाहिजे, सर्वांना सारखे पाहिजे, सर्वव्यापी पाहिजे. व्यक्तिगणिक चांगल्याची कल्पना बदलून चालणार नाही. प्रत्येकाला कदाचित खऱ्या चांगल्याचे आचरण करता येणार नाही परंतु जे खरे चांगले तेच चांगले असे निःपक्षपाती मनुष्य म्हणतो.

खरे चांगले हा आदर्श आहे आणि नित्याचे आचरण त्याच्याकडे तोंड करूनच असले पाहिजे. संपूर्ण मानवी जीवन चांगल्याने व्यापलेले आहे. खरे चांगले परमात्मस्वरूप असते. त्यात विभूतिमत्त्व असते. आणि म्हणूनच ते आनंदरूप, पूर्णरूप आणि सर्व धर्मांचे उगमस्थान असते. जो मनुष्य चांगल्याची उपासना करतो त्याच्यापुढे सर्व धर्म नम्र होऊन येतात. प्रत्येक कर्माचा (अगदी निषिद्ध सुद्धा) हेतू शुद्ध असेल तरी ते चांगलेच ठरते. थोडक्यात चांगल्याची उपासना म्हणजे भगवंताची उपासना होय. ज्या कृतीमध्ये, विचारामध्ये, परोपकारामध्ये भगवंताला स्थान नाही ते चांगले होऊच शकत नाही

Good Seeing is God seeing!

जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥

चांगले आणि वाईट याचे निकष कालानुरूप बदलत चालले आहेत असे आपण म्हणतो. परंतु आपला आतला आवाज बरोबर योग्य तेच सांगत असतो. मार्गदर्शन करत असतो. म्हणून आत्मस्वरूप असलेल्या चांगल्याची उपासना सूर्य, चंद्र, ऋतु, प्राण, प्राणी, वादळ इ. दृश्यविश्वाच्या निराळ्या अंगांना अनुलक्षून करावी.

विश्वातील व्यापारावर चांगल्याचीच सत्ता चालत असल्याने जे जे घडते ते ते (मला आवडत नसले तरीही) चांगलेच असले पाहिजे. ही मनाची भावना वाढीला लावणे जरुरीचे आहे. आपल्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती अनपेक्षितपणे दुरावतात. कधी अडचणी, संकटे येतात हे सर्व घडवण्यामागे काहीतरी चांगला हेतूच असला पाहिजे.

स्वर्गादि लोकांचे ठिकाणी पाच प्रकारांनी सामाची उपासना करावी. पृथ्वी हा हिंकार, अग्नि हा प्रस्ताव/माकी अंतरिक्ष हा उद्गीथ। आदित्य हा प्रतिहार आणि स्वर्ग हे निधन आहे. तसेच वृष्टीच्या पूर्वी वायु हा हिंकार, मेघ हा प्रस्ताव, वर्षाव हा उद्गीथ, वीज व गडगडाट हा प्रतिहार आणि वृष्टी थांबणे हे निधन आहे.

अशाच रीतीने पाणी, ऋतु, पशु, प्राण, वाणी, आदित्य यांची पाच प्रकारांनी उपासना सांगितली आहे.

© www.madhaveeragnuveer.com

२८ जून २०१९

APRIL 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

२.२

माघ कृ. ९ संवत २०६९
बुधवार ६/३/२०१३

MARCH 6 WEDNESDAY

द्वितीयः खण्डः॥ (मंत्र-३)

लोकेषु पञ्चविधं सामोपासीत ------ द्यौर्निधनमित्यूर्ध्वेषु॥

लोकदृष्ट्या पंचविध सामाची उपासना करावी.(ऊर्ध्वगत)
हिंकार, — पृथिवी
प्रस्ताव — अग्नि
उद्गीथ — अंतरिक्ष
प्रतिहार — आदित्य
निधन — द्यौः

ही उपासना ऊर्ध्वमुख लोकांच्या दृष्टीने असली तरी अवाङ्मुख म्हणजेच अधोमुख(खाली येताना किंवा पुनरावृत्तिच्या वेळी हा क्रम उलटा असतो.

अथाऽऽवृत्तेषु द्यौर्हिंकार ------ पृथिवी निधनम्॥२॥
म्हणजे द्यौ हा हिंकार व पृथिवी हे निधन आहे.
अशा रीतीने वर जाताना व खाली येताना सामाच्या विविध भागांची विविध स्थानांमध्ये कल्पना करुन सामाची उपासना करावी. या उपासनेचे फल काय मिळते?

कल्पन्ते हास्मै लोका -------- पञ्चविधं सामोपास्ते॥३॥

असे जाणणाऱ्याला व सामाची पाच प्रकारांनी उपासना करणाऱ्याला हे पाचही लोक भोग्यरुपाने प्राप्त होतात. त्याला ऊर्ध्व व आवृत्त लोक समर्थ होतात. म्हणजे त्याचा अधिकार या लोकांवर चालतो. यातील कुठलीही वस्तु त्याला हवी म्हणता लगेच मिळू शकते.

श्री. अरविंद - पूर्णयोग - अवतरण — उद्धरण (आरोहण)

© www.madhaveeraghuveer.com

२.३

तृतीयः खण्डः (मंत्र-२)

वृष्टौ पञ्चविधं सामोपासीत ------- स्तनयति स प्रतिहार उद्गृह्णाति ------ सामोपास्ते ॥२॥

वृष्टीमध्ये पाच अवयवांच्या सामाची उपासना करावी.
हिंकार - वृष्टिच्या पूर्वी प्रथम वाहणारा वारा
प्रस्ताव - मेघ निर्माण होतो
उद्गीथ - वर्षाव करतो
प्रतिहार - वीज चमकते, ढग गडगडतात.
निधन - मेघ वर्षाचा स्वीकार करून स्वतःला पाण्याने भरून घेतो. उद्गृह्णाति।

फलस्वरूप - जो हे असे जाणणारा वृष्टिमध्ये पंचविध सामाची उपासना करतो त्याच्या इच्छेप्रमाणे वृष्टि होते. किंबहुना तो मेघांकडून वृष्टि करवून घेतो.

जगन्नाथ कुंटे - नर्मदा परिक्रमा - वाईल सिध्दी.
तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च।
Rainman in China - पर्जन्यपुरुषाची उपासना.

२.४

चतुर्थः खंडः (मंत्र-२)

सर्वास्वप्सु पञ्चविधं सामोपासीत ----- समुद्रो निधनम् ... न हाप्सु प्रैत्य ------- सामोपास्ते ॥२॥

सर्व आपांमध्ये पंचविध सामाची उपासना करावी.
हिंकार - घनीभूत झालेला मेघ
प्रस्ताव - वृष्टि - प्रत्यक्ष बरसणे - पाणी पसरणे
उद्गीथ - पूर्वेकडे वाहणाऱ्या (गंगा, यमुना) नद्या.
प्रतिहार - (प्रतीचि) पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या.
निधन - समुद्र.

२.५

पञ्चमः खण्डः

ऋतुषु पञ्चविधं सामोपासीत --- --- हेमन्तो निधनम् ॥१॥
कल्पन्ते हास्मा ऋतवः - ------ पञ्चविधं सामोपास्ते ॥२॥

ऋतुंमध्ये पाच प्रकारांनी सामाची उपासना करावी
हिंकार - वसंत ऋतु - पहिला ऋतु
प्रस्ताव - ग्रीष्म ऋतु - धान्य साठवून ठेवण्याचा प्रस्ताव करतो
उद्गीथ - वर्षा - धनधान्यसमृद्धी देते.
प्रतिहार - शरद - मृत प्राण्यांना एका ठिकाणाहून दुसरीकडे नेतो
निधन - हेमंत - वायुच्या अभावाने मृत्यु येतो.
शिशिराचा समावेश हेमंतातच केला आहे.

या पंचविध सामोपासनांना जाणणारा व करणारा जो उपासक आहे त्याला ऋतु स्वानुरूप भोग देतात, भरभरून सुखसामग्री देतात. तो सर्व भोगांनी संपन्न होतो.

षष्ठः खण्डः

पशुषु पञ्चविधं सामोपासीत --- --- पुरुषो निधनम् ॥१॥
॥ भवन्ति हास्य पशवः --- --- पञ्चविधं सामोपास्ते ॥२॥

हिंकार - बकरा - पशुंमधील पहिली निर्मिती
प्रस्ताव - मेंढी - लोकर देणाऱ्या आहेत.
उद्गीथ - गाय - सर्वश्रेष्ठ
प्रतिहार घोडे - पाठीवरून वाहून नेणारे
निधन - पुरुष - या सर्वांचा सांभाळ करणारा

अशी उपासना करणाऱ्याला भरपूर पशुधन प्राप्त होते.

© www.madhavnaghuveer.com

2.6 (प्राण)



सप्तम: खण्ड: (मंत्र-२)

प्राणेषु पञ्चविधं परोवरीय: ---------- परोवरीयांसि ह लोकाञ्जयति
परोवरीयो हास्य भवति ------ इति तु पञ्चविधस्य ॥२॥

उत्तरोत्तर श्रेष्ठ होत जाणारी प्राणाची सामोपासना करावी.
हिंकार - प्राण — घ्राण
प्रस्ताव - वाणी - वाणीने सर्वत्र गोष्टींचे निरूपण केले जाते.
उद्गीथ - डोळे - वाणीहून श्रेष्ठ आहेत.
प्रतिहार - कान -
निधन - मन - सर्व इंद्रियांचे ज्ञान मनाकडे सुपूर्द केले जाते.
मनाची शक्ती सर्वांत जास्त आहे.
या प्रकारचे उपासना जाणणाऱ्या व करणाऱ्या पुरुषाला
उत्कृष्ट जीवन प्राप्त होते. उत्कृष्ट लोक प्राप्त होतात.

सप्तविध उपासना

अष्टम: खण्ड: (मंत्र-३)

अथ सप्तविधस्य वाचि ------ प्रस्तावो यदादि स आदि: ॥१॥
यदुदिति स उद्गीथो ---- निधनम् ॥२॥
दुग्धेऽस्मै वाग्दोहं यो ------- सप्तविधं सामोपास्ते ॥३॥



हिंकार, प्रस्ताव, आदि, उद्गीथ, प्रतिहार, उपद्रव, निधन.
हिंकार - वाणीचे हुं असे रूप
प्रस्ताव - प्र असे रूप
आदि - आ असे रूप - आदि म्हणजेच ॐकार
उद्गीथ - उत् असे रूप
प्रतिहार - प्रति असे रूप
उपद्रव - उप असे रूप
निधन - नि असे रूप



© www.madhavaeraghuveer.com

अशी सप्तविध उपासना करणाऱ्याला वाणीचा दोह प्राप्त होतो. म्हणजेच वेद, वेदांगे, शास्त्र त्याला सुलभतेने प्राप्त होते. त्याचे आकलन होते. त्याच्याजवळ प्रचुर मात्रेने अन्नधान्य राहते. त्याला अन्नाचा भोग घेण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. मधुर वाणी असलेल्याला कधीही अन्नाची ददात पडत नाही.

आदित्य

नवम: खण्ड: (मंत्र २)

अथ खलु अमुम् आदित्य -------- सर्वेण सम्स्तेन साम ॥१॥
तस्मिन् इमानि सर्वाणि -------- ह्येतस्य साम्नः ॥२॥

आदित्य सर्वांकडे समभावाने पाहतो ∴ त्याला साम म्हणायचे. शिवाय (चंद्राप्रमाणे) आदित्यात वृध्दी वा क्षय नसतो, तो सदा साम आहे. त्या आदित्यामध्ये सप्तविध सामाची भावना ठेवून उपासना करायची.

सर्व भूते या आदित्यामध्येच अनुगत आहेत. जन्माला आलेली सर्व भूते त्याच्यावरच अवलंबून असतात. (हत्ती-मुंगी) त्याच्यापासूनच सर्वांना ऊर्जा प्राप्त होते.

या आदित्याच्या उदयापूर्वी उष:काल असतो तोच हिंकार आहे. या हिंकाररूपाने सर्व पशु अनुगत आहेत. ∴ ते हिंकार करतात. सूर्योदय होण्यापूर्वीच पशु ओरडू लागतात. ते आदित्याचे हिंकार पात्र आहेत.

अथ यत् प्रथमोदिते -------- प्रस्तावभाजिनो ह्येतस्य साम्नः ॥३॥
अथ यत् सङ्गववेलायां -------- ह्येतस्य साम्नः ॥४॥

उगवत्या सूर्याचे अगदी उगवल्या उगवल्या जे रूप असते



©www.madhuveeraghuveer.com

जो प्रस्ताव समजावा. याच्या या रूपाचे अन्वायन मनुष्य आहे. ते अनुगामी आहेत. ∴ ते सूर्याची प्रस्तुति (प्रत्यक्ष स्तुति) व प्रशंसा करतात (अप्रत्यक्ष/परोक्ष स्तुति) & या सामाच्या प्रस्तावाचे भजन करण्याचे त्यांचे शील असते.
सूर्यकिरणांचा जगन्मंडलाशी किंवा वत्साचा गाईशी संगम होण्याचा जो काळ तो संगवकाळ (सूर्योदयानंतर तीन मुहूर्त गेल्यानंतरची वेळ) या रूपाचे अनुगत पक्षी असतात. त्यामुळे ते या सामाच्या आदिचे भजन करतात.
आदि म्हणजे ॐकार। पक्षी ओंकाराचे भजन करतात म्हणून ते अंतरिक्षात कोणताही आधार न घेता स्वतःला सर्वत्र नेऊ शकतात.

अथ यत् सम्प्राति ------------ श्येतस्य साम्नः ॥५॥
अथ यत् ऊर्ध्वं ------------ प्रतिहारभाजिनो ऐतस्य साम्न ॥६

माध्यान्हीला जे आदित्याचे रूप असते ते उद्गीथ. याच्या या रूपाला देव अन्वायत्त आहेत. म्हणून ते प्रजापतीच्या अपत्यामध्ये सत्तम (विशेष) आहेत. कारण या सामाच्या उद्गीथाचे ते भजन करतात.
नंतर जे माध्यंदिनाच्या नंतर व अपरान्हापूर्वी सूर्याच्या प्रतिहार रूपाचे भजन करतात. त्या रूपाचे अनुगत गर्भ असतात. ते वर आकृष्ट केले गेल्यामुळे खाली पडत नाही. ते सूर्याकडून आकर्षिले गेले असतात म्हणून ते खाली पडत नाहीत. गर्भाशयातच सुरक्षित राहतात.

अथ यद् ऊर्ध्वम् अपराह्णात् ........ ह्येतस्य साम्नः ॥७॥
अथ यत्प्रथमास्तमिते ........ सप्तविधं साम उपासते ॥८॥

नंतर अपराह्णाच्या नंतर व अस्तमयाच्या पूर्वी जे सूर्याचे रूप आहे ते म्हणजे उपद्रव! त्याचे अनुगत वन्य पशू असतात. ते या उपद्रवभक्तीला पात्र असतात. ते माणसांना बघून वनात किंवा गुहेत पळून जातात. कारण तिथे त्यांना भीती वाटत नाही.

अस्तमितसमयी आदित्याचे जे रूप असते ते निधन! त्या रूपाचे अनुगत पितर असतात. म्हणून त्यांना पिंडरूप दर्भावर स्थापन करतात. पितर या सामाचे भजन करतात.

अशा प्रकारे आदित्याची सप्तविध सामरूपाने उपासना करतात. आदित्य सर्वदा सम आहे. तो समान बुद्धि उत्पन्न करतो म्हणून तो सर्वांशी सम आहे ∴ तो साम आहे.

सूर्याच्या सात रूपांशी सामाच्या सात अवयवांबरोबर साम्य करून ही उपासना करावी.

सूर्य - ७ संख्येला महत्त्व - सात घोड्यांचा रथ
भानुसप्तमी — रथसप्तमी.

॥ दशमः खण्डः ॥ (मंत्र - ६)

अथ खल्वात्मसंमितम् ........ इति त्र्यक्षरं तत्समम् ॥१॥
आदिरिति द्व्यक्षरं ........ तेन एकं तत्समम् ॥२॥

त्यानंतर आत्मसंमित - सामावयवांच्या तुल्य, अतिमृत्यु सप्तविध सामाची उपासना करावी. हिंकार व प्रस्ताव या दोन्हींमध्ये तीन तीन अक्षरे येतात. म्हणून हे दोन्ही अवयव समान अक्षरांनी बनले आहेत ∴ सम आहेत.

© www.madhavaraghuveer.com

न उक्तं यत्र इति नाकम् - स्वर्ग
(दुःख पाप)



आदि या तिसऱ्या अवयवात दोन अक्षरे तर प्रतिहार या शब्दात चार अक्षरे आहेत. तेव्हा सोयीसाठी त्यातील एक अक्षर जर आदि या अवयवात मिसळले तर दोन्ही सम होतील.

उद्गीथ इति त्र्यक्षरमुपद्रव ------ अक्षरं तत्समम् ॥ ३ ॥
निधनमिति त्र्यक्षरं तत्सममेव ------ द्वाविंशतिरक्षराणि ॥ ४ ॥

उद्गीथ हा तीन अक्षरांचा तर उपद्रव चार अक्षरांचा आहे. तेव्हा उपद्रव मधील एक अक्षर अवशिष्ट राहते. ते काढले तरी तेही अक्षरच आहे. त्यामुळे तेही पूर्वीच्यांशी समान आहे.
निधन हा शब्द तर तीन अक्षरांचा असल्यामुळे सर्वांसारखा आहे. अशी एकूण सात अवयवांची बावीस अक्षरे होतात.

एकविंशत्या आदित्यम् ------ तन्नाकं विशोकम् ॥ ५ ॥
आप्नोति हादित्यस्य ------ सामोपास्ते सामोपास्ते ॥ ६ ॥

आदित्यलोक हा एकविसावा आहे. बारा महिने, पाच ऋतु, तीन लोक - (स्वर्ग, मृत्यु, पाताळ) यांच्या देवता २० आहेत. व एकविसावा आदित्यलोक आहे, असे श्रुतिवचन आहे.
या एकवीस अक्षरांच्या सहाय्याने साधक आदित्यलोक प्राप्त करतो परंतु बाविसाव्या अक्षराने साधक आदित्याहून पर अशा स्थानालाही जिंकतो. म्हणजेच सामाची उपासना मृत्युच्या पलीकडे घेऊन जाते. ते स्थान आहे नाक - म्हणजे जिथे शोक व दुःख नाही केवळ आनंदच आहे.
तो आदित्याच्या जयास प्राप्त होतो. आदित्याच्या जयाहून यात मोठा जय मिळतो. जो हे असे जाणतो तो आत्मसंमित, अतिमृत्यु व सामाची सप्तविध उपासना करतो.
सामोपास्ते. द्विरुक्ति समाप्तिसूचक आहे.

© www.madhaveeraghuveer.com

एकादशः खण्डः

मनो हिंकारो वाक्प्रस्तावश्चक्षुरुद्गीथः श्रोत्रं प्रतिहारः प्राणो निधनमेतद्गायत्रं प्राणेषु प्रोतम् ॥१॥

गायत्र नावाचे हे साम प्राणावर अधिष्ठित आहे किंवा प्राणांच्या ठिकाणी गुंफलेला आहे. त्यात मन हा हिंकार वाणी हा प्रस्ताव, चक्षु हा उद्गीथ, कान हा प्रतिहार आणि प्राण हा निधन आहे. प्राणरूपाने गायत्रीचे स्तवन केले आहे.

स य एवमेतद्गायत्रं प्राणेषु प्रोतं वेद प्राणी भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्या महामनाः स्यात्तद्व्रतम् ॥२॥
(विष्णुचे एक नाव)

प्राणांमध्ये गुंफलेला हा गायत्रसाम जो जाणतो तो प्राणयुक्त होतो. पूर्ण आयुष्य प्राप्त करतो (ज्योक) (म्हणजे उज्वल) जीवन जगतो. त्याला प्रजा, पशु, कीर्ति मिळते. गायत्री सामाची उपासना करणारा उदारहृदयी असावा. हेच व्रत आहे.

★ चांगल्याची उपासना ही अंतरंगाने व बहिरंगाने, दोन्ही बाजूंनी करावी. तशी केली असता माणसाच्या जीवनाचे सोने होते. तो अंतर्बाह्य उज्वल होतो.

यज्ञाचे रूपक

१. हिंकार - अभिमंथन करणे. अरणीवर काष्ठ घासणे
२. प्रस्ताव - धूर होणे. आग्नि निर्माण होत असल्याची सूचना
३. उद्गीथ - ज्वाळ होणे. प्रत्यक्ष आग्नि प्रकट होणे
४. प्रतिहार - निखारे होणे
५. निधन - राख होणे

© www.madhaveeraghuveer.com

३ जुलै २०१९



ही उपासना करत असताना व्रत पाळायला हवे. मन विशाल असावे. नित्याचे काही उपवास करावेत. त्याने मनोबल वाढते. स्त्रियांची अवहेलना करु नये. कोणाची निंदा करु नये. परक्यांना तुच्छ मानू नये. मांसभक्षण करु नये. संतांची निंदा करु नये.

द्वादश: खण्ड: ।

अभिमन्थति स हिंकारो ---------मेतद् रथन्तरमग्नौ प्रोतं
स य एवमेतद् ------------न निष्ठीवेत् तद् व्रतम् ॥

रथन्तर साम - अरणीमध्ये मंथन करुन अग्नि बाहेर काढणे हा हिंकार, धूर हा प्रस्ताव, प्रत्यक्ष अग्नि [illegible] हा उद्गीथ निखारे हा प्रतिहार व अग्नि शांत होणे हे निधन आहे.

अग्निमंथन करताना रथन्तर साम गायला जातो. आणि हे रथन्तर साम अग्निवर प्रतिष्ठित आहे हे जो जाणतो तो ब्रह्मवर्चसाने संपन्न होतो. ज्ञानाचे तेज त्याच्या चर्येवर येते. तो अन्न व इतर सर्व भोग भोगण्यास समर्थ होतो. तो पूर्ण आयुष्य जगतो. अकालमृत्यु त्याला येत नाही.



ज्योक् जीवाते म्हणजे उज्वल जीवन जगतो. मुलेबाळे, पशुपक्षी यांची समृध्दी लाभते. कीर्ति मिळते.

आणि त्यङ्ग न आचामेत् न निष्ठीवेत् याचा अर्थ

☆ त्याने अग्निकडे पाहून काही खाऊ नये. पिऊ नये. आचमन करु नये. किंवा त्याच्याकडे पाहून थुंकू नये हे व्रत म्हणून आचरण करावे.

फलश्रुति - श्री वर्चस्व, आयुष्य आरोग्य, धन-धान्य, पशु, बहुपुत्रलाभ शतसंवत्सर दीर्घ आयु:॥

त्रयोदशः खण्डः।

उपमन्त्रयते स हिंकारो ---------- मिथुने प्रोतम् ॥१॥
स य एवम् एतत् वामदेव्यं ------ परिहरेत् तद् व्रतम् ॥२॥

स्त्रीपुरुष संबंध हे देखील जणु सामगायनच आहे. त्याला वामदेव्य साम म्हटले आहे.

पुरुष स्त्रीला जवळ येण्यासाठी जो संकेत देतो, उपमन्त्रण करतो तोच हिंकार आहे. तिच्याशी गोड बोलून तिला प्रसन्न करतो. तोच प्रस्ताव आहे. स्त्रीबरोबर शयन करतो तो उद्गीथ आहे. आपल्या अनेक स्त्रियांपैकी प्रत्येकीबरोबर शयन करतो तो प्रतिहार आहे. प्रत्यक्ष मैथुनात घालवलेला काळ व त्या क्रियेची समाप्ति हे निधन आहे.

वस्त्रदानादिकाने स्त्रीला संतुष्ट करणे - प्रस्ताव आहे.
एका पर्यंकावर जाणे हे उद्गीथ
स्त्रीला अभिमुख होणे हा प्रतिहार
मैथुनाने समाप्ति हे निधन आहे

जो हे जाणतो तो मिथुनी होतो. अविधुर होतो. प्रत्येक मिथुनापासून तोच उत्पन्न होतो. अपत्यप्राप्ति होते. त्याचे वीर्य शक्तिशाली असते. त्याला पूर्ण आयुष्याचा भोग घेता येतो. जीवन उज्वल होते. समागमाच्या इच्छेने आलेल्या पत्नीचा अव्हेर करु नये. हे व्रत आहे. स्त्री पुरुष संबंध हे प्रजापति व्रत आहे. पुरुषाला अनेक स्त्रिया असू शकतात. त्यामुळे स्त्रीला नकार देण्याचा अधिकार आहे. परंतु स्त्रीने इच्छा व्यक्त केली असता (तिला तशी सुविधा नसल्याने) पुरुषाने तिला नकार देऊ नये. तिची गरज भागवली पाहिजे. तिच्या शारीरिक गरजांचा, अवयवांचा, शरीर क्रियांचा कोणीही तिरस्कार करु नये. स्त्री तृप्त समाधानी तरच घर आनंदी! समंजस दृष्टीकोन होता.

२ जुलै २०१८



२.१४

चतुर्दशः खण्डः ।

उद्यन् हिंकार उदितः ------------ बृहदादित्ये प्रोतम् ।।१।।
स य एवमेतद् --------- तपन्तं न निन्देत तद् व्रतम् ।।२।।

बृहत्सामाची कल्पना दिवसाच्या सूर्याच्या स्थितीवर केली आहे. उदय पावणारा सविता हा हिंकार, उदय पावलेला सूर्य हा प्रस्ताव. माध्यान्हीचा सूर्य सर्वांत अग्रभागी म्हणून श्रेष्ठ असतो तो उद्गीथ आहे. अपरान्ह म्हणजे गुरे घरी परतण्याची वेळ म्हणजेच गोरज मुहूर्त हा प्रतिहार नंतर सूर्याच्या अस्त होतानाचे रूप म्हणजे निधन आहे.

फलश्रुति - आदित्यामध्ये ओतप्रोत असणाऱ्या बृहत्सामाला जाणणारा स्वतः तेजस्वी होतो. तो अन्नाद म्हणजे अन्न खाण्यास समर्थ होतो. आपले पूर्ण उज्वल आयुष्य जगतो त्याला पुष्कळ प्रजा व पशु प्राप्त होते. महान कीर्ति लाभते.

* अशा उपासकाने कधीही तापणाऱ्या सूर्याची निंदा करू नये. हे व्रत म्हणून पाळावे.

सूर्य त्याचे काम करतो म्हणून तर हे सृष्टिचक्र योग्य रीतीने चालले आहे. म्हणून उपासकाने हे व्रत निष्ठेने पाळावे. 'काय हा उन्हाळा' अशी निंदा करू नये.

२.१५ पञ्चदशः खण्डः ।

अभ्राणि संप्लवन्ते स ------------ पर्जन्ये प्रोतम् ।।१।।
स य एवमेतद् वैरूपं पर्जन्ये -------- न निन्देत् तद् व्रतम् ।।२।।

हिंकार - अभ्र बनतात एकत्र येतात
प्रस्ताव - मेघ उत्पन्न होतात.
उद्गीथ - मेघ बरसणे
प्रतिहार - वीजा चमकतात, मेघ गडगडतात. निधन - वृष्टि थांबते

With Best Compliments From

गायत्र साम - प्राणांमध्ये गुंफलेला आहे
रथन्तर साम - अग्नि
वामदेव्य साम - स्त्रीपुरुष संबंध
बृहत्साम - आदित्यामधील
वैरूप साम - पर्जन्यामधील
वैराज साम - ऋतुंमधील

APRIL 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

फाल्गुन शु. ८ संवत २०६९
बुधवार २०/३/२०१३

MARCH 20 WEDNESDAY

असा हा वैरूप साम पर्जन्यामध्ये ओतप्रोत आहे.
फल - पर्जन्यामधील वैरूप सामाला जो जाणतो त्याला विरूप व सरूप पशू प्राप्त होतात, त्याचा गोठा वाड (कुंपण) पशुधनाने समृद्ध राहते. त्याला पूर्ण आयुष्य प्राप्त होते, उज्वल जीवन लाभते. प्रजा व पशू मिळतात. त्याची मोठी कीर्ति होते. त्याने व्रत म्हणून कधीही बरसणाऱ्या मेघाची निंदा करायची नाही.
किती हा पाऊस, काय हा चिखल, कपडे वाळत नाहीत अशी पावसाशी संबंधित कोणतीही तक्रार नको. उलट पावसामुळेच अन्नधान्य, जल मिळते म्हणून नेहमीच त्याच्याविषयीच कृतज्ञता बाळगायची.

२.१६ षोडश खण्डः ॥
वसन्तो हिंकारो ग्रीष्मः - - - - - - - - वैराजमृतुषु प्रोतम् ॥१॥
स य एवमेतद् - - - - - - - - - - न निन्देत् तद् व्रतम् ॥२॥

ऋतु हे स्वधर्माने विराजमान होत असल्याने वैराज साम हा ऋतुंत प्रोत (ओवलेला) असणे योग्यच आहे.
वसंत हा हिंकार, ग्रीष्म हा प्रस्ताव, वर्षा उद्गीथ तर शरद प्रतिहार आणि हेमंत हे निधन आहे. (शिशिर हा हेमंतामध्येच अंतर्भूत आहे.) असा हा वैराज साम ऋतुंमध्ये अनुस्यूत आहे. बांधला गेला आहे.
हे जाणणारा ब्रह्मतेजाने शोभून दिसतो. त्याला पुष्कळ प्रजा, पशु, मुलेबाळे, नोकरचाकर, नातेवाईक लाभतात. त्याचा गोठा सदैव भरलेला असतो. तो उज्वल जीवन जगतो. त्याची कीर्ति सर्वत्र पसरते. अशा उपासकाने कोणत्याच ऋतुची निंदा करू नये. थंडी जास्त झाली तरी ती सहन करावी.

© www.madhaveelaghuveer.com

२.१७

MVAT for Feb.
ESI Payment



सप्तदश खण्डः ॥

पृथिवी हिंकारोऽन्तरिक्षं --------- शक्वर्यो लोकेषु प्रोतः ॥१॥
स य एवमेताः शक्वर्यो ------ न निन्देत् तद्व्रतम् ॥२॥

शक्वरी साम हा लोकांमध्ये प्रोत (भरलेला) आहे. यातील पृथ्वीलोक हा हिंकार, अंतरिक्ष हा प्रस्ताव, द्यौ हा उद्गीथ, दिशा हा प्रतिहार तर समुद्र हे निधन आहे. हे जो जाणतो तो लोकवान होतो. त्याला कधीही अपमृत्यु येत नाही. तो पूर्ण जीवन जगतो. प्रजा, पशु, कीर्ति प्राप्त होते. अशा शक्वरी सामाच्या उपासकाने लोकांची निंदा करू नये. हे व्रत म्हणून आचरावे.

२.१८ ॥अष्टादश खण्डः ॥

अजा हिंकारोऽवयः प्रस्तावो -------- रेवत्यः पशुषु प्रोताः ॥१॥
स य एवमेता रेवत्यः ------- पशून् न निन्देत् तद् व्रतम् ॥२॥

हे रेवती साम पशुंमध्ये अनुस्यूत आहे. यातील बकऱ्या हा हिंकार, मेंढ्या हा प्रस्ताव, गायी हा उद्गीथ, घोडे म्हणजे प्रतिहार तर पुरुष (माणूस) हे निधन आहे.
शक्वर्यः / रेवत्यः हे नेहमी बहुवचनात वापरतात.
या रेवत्य सामाला जाणणारा पशुवान होतो. त्याला सर्व पशु वश होतात, तो उत्तम व पूर्ण आयुष्य जगतो त्याला मोठी कीर्ति मिळते.
अशा रेवत्य साम उपासकाने कधीहि पशूंची निंदा करू नये. हे व्रत म्हणून पाळावे. मरतुकडे ढोरे, वांझ गाय, मारकी गाय, म्हातारा बैल असे शब्द वापरू नयेत.

© www.madhaveeraghulweer.com

शक्वर साम - लोक
रेवत्य. साम - पशु.
यज्ञायज्ञीय - शरीरातील अंगांगात भरलेला
राजन साम - देवनांमध्ये अनुस्यूत
सर्वविषयक साम - सर्वांमध्ये भरलेला आहे.
२.१९



एकोनविंशः खण्डः ॥

लोम हिंकारस्त्वक् प्रस्तावो ------- यज्ञायज्ञीयमङ्गेषु
स य एवमेतद् --------- मज्ज्ञो नाश्नीयादिति वा व्रतम् ॥२॥

शरीरातील अंगांगामध्ये भरलेला हा यज्ञायज्ञीय साम आहे. लव हा हिंकार, त्वचा हा प्रस्ताव, मांस हे उद्गीथ, आस्थि हा प्रतिहार व मज्जा हाडांच्या मध्ये असलेला द्रवपदार्थ (मेद-वसा) हे निधन आहे.

या यज्ञायज्ञीय सामाला जो जाणतो तो यज्ञी होतो, म्हणजेच त्याचे सर्व अवयव ठाकठीक राहतात. तो कधीही पंगु, अधू होत नाही. पूर्ण आयुष्य, उज्ज्वल जीवन, प्रजा व पशुंची समृद्धी, कीर्ति प्राप्त होते.

अशा यज्ञायज्ञीय सामाच्या उपासकाने एक वर्षभर तरी मांस मासे खाऊ नयेत. किंवा कधीच खाऊ नयेत.

२.२० विंशति खण्डः ॥

अग्निर्हिंकारो वायुः प्रस्तावः -------- देवतासु प्रोतम् ॥१॥
स य एवमेतद् राजनं -------- न निन्देत् तद् व्रतम् ॥२॥

अग्नि हा हिंकार, वायु - प्रस्ताव, आदित्य उद्गीथ, नक्षत्रे ही प्रतिहार तर चंद्रमा हे निधन आहे. हा राजन साम देवतामध्ये अनुस्यूत आहे. द्योतनात् देवः - देव दीप्तिमान आहेत.

हा राजन साम देवलोमध्ये अनुस्यूत आहे हे जाणणाऱ्यांना सलोकता, सार्ष्टिता व सायुज्यता प्राप्त होते. म्हणजे तो देवलोकी राहतो, ऐश्वर्य प्राप्त करतो व त्यांच्याशी एकरूप होऊन राहतो. अशा सामाच्या उपासकाने कधीही ब्राह्मणांची निंदा करू नये. हे व्रत म्हणून सांभाळावे.

© www.madhaveeraghuveer.com

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि

**MARCH 23 SATURDAY**

फाल्गुन शु. ११ संवत २०६९
शनिवार २५/३/२०१३

FEBRUARY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

२.२१ एकविंशति खण्डः ॥ मंत्र १॥

त्रयी विद्या हिंकारस्त्रय-------- सर्वस्मिन् प्रोतम् ॥१॥
स य एतत्साम-------- सर्वं ह भवति ॥२॥

ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन वेद म्हणजेच तीन विद्या हा यांचा प्रारंभ आहे. सर्व गोष्टींची सुरुवात वेदांपासूनच होते. त्रैविद्या हा हिंकार आहे. त्रैलोक्य म्हणजेच भूः भुवः स्वः अर्थात् पृथ्वी अंतरिक्ष व स्वर्ग हा याचा प्रस्ताव आहे. अग्नि वायु व आदित्य हा याचा उद्गीथ आहे. नक्षत्रे, पक्षी व किरणे हा प्रतिहार आहे आणि साप, गंधर्व व पितर हे निधन आहे. हा सर्वविषयक साम सर्वांमध्ये भरलेला आहे.

ज्याला या सामाविषयी समजते तो स्वतः सर्वच बनतो. सर्वांचा स्वामी म्हणजेच सर्वेश्वर बनतो.

तदेष श्लोको यानि पञ्चधा-------- न ज्यायः परमन्यदस्ति
यस्तद् वेद सर्वं सर्वा-------- तद् व्रतम् ॥ ४ ॥

ह्या ज्या तीन तीन गोष्टी पाच अंगांच्या सांगितल्या

**SUNDAY, MARCH 24** फाल्गुन शु. १२ संवत २०६८

आहेत त्या पंधरा गोष्टींहून मोठे श्रेष्ठ असे या विश्वात काहीही नाही. थोडक्यात या पंधरा गोष्टीत सर्व इतर गोष्टी अंतर्भूत आहेत.

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, अग्नि, वायु, आदित्य, नक्षत्रे, पक्षी, किरण, साप, गंधर्व, पितर - १५ गोष्टी सर्वविषयक साम सर्वांत भरलेला आहे हे जो जाणतो तो सर्वज्ञ होतो. सर्व दिशांमध्ये राहणारे लोक त्याला बळी आणून देतात. सर्व स्हेय भोग तिथे उपस्थित होतात. अशा उपासकाने मीच सर्व काही आहे या भावनेने उपासना करावी.

२.२२

## द्वाविंशति खण्ड

विनर्दि साम्नो वृणे । पशव्यम् इतो अग्नेः उद्गीथो । अनिरुक्तः प्रजापतेः । निरुक्तः सोमस्य । मृदु श्लक्ष्णं वायोः । श्लक्ष्णं बलवत् इन्द्रस्य । क्रौञ्चं बृहस्पतेः । अपध्वान्तं वरुणस्य । तान् सर्वान् एव उपसेवेत वारुणं तु वर्जयेत् ॥

बैलाच्या डुरकण्यासारख्या विशेष स्वरात गाणे म्हणजे विनर्दि साम गाणे. हे पशूंना हितकर असते. याच्या गायनाने पशुधनाचा लाभ होतो. अग्नीला उद्गीथ आवडते. हे उद्गीथ प्रजापतीसाठी गाताना काहीसे अस्पष्टपणे गावे. मात्र सोमप्राप्तिसाठी स्पष्ट शब्दोच्चार करावे. वायुसाठी मृदु, कोमल, सोप्या स्वरात गावे. [अनिरुक्त - अमक्यासारखा हा असे भिन्नत्वाने ज्ञात होत नाही. प्रजापति ज्याची देवता आहे तो प्राजापत्य गानविशेष! कारण प्रजापति नील पीत इ० नी निश्चय करून सांगता येत नाही. मात्र ज्याची देवता सोम आहे तो उद्गीथ निरुक्त स्पष्ट आहे असा भावार्थ आहे.]

इंद्रासाठी गाताना सुलभ पण बलवान स्वरांनी गावे. बृहस्पतीसाठी गाताना क्रौंच पक्ष्यासारखा आवाज काढावा. फुटलेल्या काशाच्या भांड्याच्या स्वरासारखा आवाज वरुणासाठी गाताना (बेसूर) काढावा. सर्वांसाठी यथासंपन्न यथाधिकार स्वरांची योजना करावी. पण वरुणासाठी साम म्हणू नये. त्याला वर्ज्य करावे. कोणत्याही देवतेसाठी सामगायन गाताना त्याला योग्य अशा स्वरात सामगायन केले की ती देवता प्रसन्न होते. प्रत्येक देवतेची आवड लक्षात घेऊन सामगायन करावे. असे उद्गान करताना कशाचे ध्यान करावे? ते पुढील मंत्रात स्पष्ट केले आहे.

© www.madhavdeoraghuveer.com

७ जुलै २०१९



अमृतत्वं देवेभ्य आगायानि इति आगायेत स्वधां
पितृभ्यः आशां मनुष्येभ्यः तृणोदकं पशुभ्यः स्वर्गलोकं
यजमानाय अन्नम् आत्मनः आगायानि इति एतानि
मनसा ध्यायन् अप्रमत्तः स्तुवीत ॥२॥

मी देवांसाठी अमृतत्व साधतो किंवा देवांना अमृतत्व मिळावे म्हणून मी देवांसाठी सामाचे गायन करीन. पितरांसाठी स्वधा (त्यांचे अन्न) मनुष्यांसाठी आशा (त्यांना हवे ते - इष्ट) पशूंसाठी तृणोदक - मुबलक चारापाणी, तसेच यजमानासाठी स्वर्गलोक मिळावा. शिवाय स्वतःच्या देहरक्षणासाठी आवश्यक ते अन्न मिळावे. हा भाव मनात ठेवून सामाचे गायन करावे. सावधानपणे स्तुति करावी. हे म्हणत असताना कोणताही प्रमाद घडू नये. (अप्रमत्तः) सामाचे गायन करत असताना स्वर, ताल आरोह - अवरोह यांचे भान ठेवून प्रार्थनेचा भाव मनात ठेवून, धर्मकार्य समजून सामाचे गायन केले तर परमेश्वर प्रसन्न होतो, तथास्तु म्हणतो.

सर्वे स्वरा इन्द्रस्य आत्मानः सर्वे उष्माणः प्रजापतेः
आत्मनः सर्वे स्पर्शाः मृत्योः आत्मानः तं यदि
स्वरेषु उपालभेत इन्द्रं शरणं प्रपन्नः अभूवम् सः
त्वा प्राति वक्ष्यति इति एनं ब्रूयात ॥३॥

या मंत्रामध्ये ध्वनिशास्त्राचा Phonetics अभ्यास केलेला आढळतो. वेदांच्या षडंगापैकी हे एक अंग आहे.
व्याकरण, ज्योतिष, निरुक्त, ध्वनिशास्त्र
हे ध्वनिशास्त्र अत्यंत प्रगल्भ आहे. प्रत्येक वर्णाचा उच्चार कसा करायचा याचा बारकाईने विचार झाला आहे.



© www.madhaveerachuveer.com

प्रत्येक उच्चाराची तोंडातील स्थाने व त्यांच्या देवता ठरलेल्या आहेत. ∴ उच्चारण शुध्दच व्हायला हवे.

'अ' या स्वराचा उच्चार अनाहत ध्वनिच्या जवळचा आहे. ∴ अक्षराणाम् अकारोऽस्मि म्हटले आहे.

अ ते अः हे स्वर कुठेही स्पर्श न होता केवळ ओठांचा आकार बदलून म्हणता येतात. मात्र क च ट त प या वर्णगटांचा उच्चार करताना कुठल्यातरी भागाला स्पर्श होतो. त्यावरूनच कंठ्य, तालव्य, दन्त्य, ओष्ठ्य, मूर्धन्य असे वर्गीकरण केले जाते.

य र ल व हे अर्धस्वर आहेत तर श ष स ह हे ऊष्मवर्ण आहेत. त्यासाठी अधिक श्वासांची गरज असते.

वर्णामधील स्वर (अ ते अः) हे बलवान इंद्राचे आत्मा आहेत. या स्वरांचा उच्चार करताना इंद्राला शरण गेले तर योग्य उच्चार होतो आणि जर त्यात काही चूक झाली तरी त्या चुकीचा दोष उच्चारण करणाऱ्याला लागत नाही. कारण ज्याला शरण जातो तो त्याचा भार वहायला समर्थ असतो.

श ष स ह हे वर्ण हे प्रजापतीचे किंवा विराट/कश्यपाचे आत्मा आहेत. ∴ प्रजापतिला शरण जावे.

सर्व स्पर्श वर्ण (क ते म) यांचा आत्मा मृत्यु आहे. त्याला शरण गेले असता दोष बाधत नाही.

देवाचे स्मरण करून उच्चारण केले तर तो दोष देवांच्या मानेला जातो. उच्चारणकर्त्याला शिक्षेचे भय उरत नाही.

© www.madhavveeraghuveer.com

अथ यदि एनम् उष्मेसु उपालभेत प्रजापतिं शरणं प्रपन्नः अभूवम् सः त्वा प्रति पेक्ष्यति इति एनं ब्रूयात्।अथ यदि एनं स्पर्शेषु उपालभेत मृत्युं शरणं प्रपन्नः अभूवम् सः त्वा प्रति धक्ष्यति इति एनं ब्रूयात्॥४॥

उष्म वर्णाच्या उच्चारणात जर काही चूक होते आहे असे कुणी म्हणाला तर त्याला म्हणावे की या उच्चारणाच्या वेळी मी प्रजापतीचा आश्रय केल्याने तो तुला चिरडून टाकेल. किंवा स्पर्शवर्णाविषयी कुणी दोष दिला तर मी त्या वेळी मृत्युला शरण गेलो असल्याने तो (मृत्यु) तुला जाळील असे त्याला म्हणावे. थोडक्यात आपल्याकडून पूर्ण प्रयत्न करून, काळजी घेऊनही जर उच्चारणात चूक झाली तरी ऋत्विजाला त्याचा दोष लागत नाही. त्या त्या वर्णाचे अधिपती देव ती जबाबदारी स्वीकारतात.

सर्वे स्वरा घोषवन्तो बलवन्तो वक्तव्या इन्द्रे बलं ददानि इति सर्वे उष्माणो ऽग्रस्ता अनिरस्ता विवृता वक्तव्याः प्रजापतेः आत्मानं परिददानि इति सर्वे स्पर्शा लेशेन अनभिनिहिता वक्तव्याः। मृत्योः आत्मानं परिहराणि इति॥५

जो खोडसाळपणे दोष काढतो त्याला कसे उत्तर द्यावे हे जरी मागील मंत्रात सांगितले असले तरी त्याचा अर्थ आपण कसाही उच्चार करावा असे होत नाही. स्पष्ट व शुध्द उच्चारणासाठी देवांचे सहाय्यही घ्यावे.

© www.madhaveeragnihotri.com

सर्व स्वर घोषयुक्त व बलयुक्त असे म्हणावे. व त्या वेळी मी इंद्रामध्ये बलाचे आधान करते असे चिंतन करावे. ऊष्म वर्णांचा उच्चार करताना ते मोठ्याने व जोर देऊन म्हणायला हवेत. तोंडातल्या तोंडात पुटपुट नये. शब्द खाऊ नयेत. किंवा त्यांना जोरात फेकूही नये

तोंड अग्रस्ता - घशात ओढल्याप्रमाणे

अनिरस्ता - बाहेर फेकल्याप्रमाणे

विवृता : - तोंड व्यवस्थित उघडून

अनाभिनिहिता - एकमेकात न मिसळता

तोंड व्यवस्थित हवे तेवढ्या उघडून स्पष्टपणे उच्चार करावा. जणू काही मी प्रजापतिला आपल्या आत्म्याचे दान देत आहे अशी भावना असेल तर तोच व्यवस्थित उच्चार करवून घेईल. स्पर्श वर्णांचा उच्चार करताना सुद्धा असेच एकमेकात मिसळू देऊ नयेत. प्रत्येक वर्णाचा वेगळा व स्पष्ट उच्चार व्हावा. मृत्यु टाळण्यासाठी आपण जेवढे सतर्क व सजग असतो तितकी काळजी उच्चारण करताना घ्यावी. घाई गडबडीत एकमेकात शब्द गुरफटू देऊ नयेत.

आणि हे सर्व गुरुकुलात शिकायला मिळत असे. सतत गुरुजींच्या सान्निध्यामुळे हे उच्चारण जमत असे. त्यामुळे पुस्तकात जरी खुणा असल्या तरी वैदिक सूक्तांचे उच्चार गुरुमुखातूनच शिकावे लागतात.

© www.madhaveeraghuveer.com

४ जुलै २०१९



| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

२.२३

त्रयोविंश खण्डः॥ मंत्र-३

त्रयो धर्मस्कन्धा यज्ञोऽध्ययनं दानमिति प्रथमस्तप एव द्वितीयो ब्रह्मचार्य-कुलवासी तृतीयोऽत्यन्तमात्मानम् आचार्यकुले अवसादयन् सर्व एते पुण्यलोका भवन्ति ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति॥ १॥

धर्माचे तीन स्कंध आहेत.
१. यज्ञ, अध्ययन व दान (ब्राह्मणांची ६ कर्तव्ये)
२. तप (विविध व्रते, नेम करून शरीर क्षीण करणे)
३. आचार्यकुळात राहणारा ब्रह्मचारी. (ब्रह्मप्राप्तिसाठी, ज्ञानप्राप्तिसाठी अध्ययन करणारा)

ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी व वानप्रस्थाश्रमी जे व्रते, नेम करतात, त्याने त्यांना पुण्यलोक प्राप्त होतो. परंतु जे ब्रह्मामध्येच स्थिर होऊन राहतात त्यांना अमृतत्व प्राप्त होते. म्हणजेच ते जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतात. ब्रह्माशी एकरूप होतात.

प्रजापतिर्लोकानभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्यस्त्रयी विद्या सम्प्रास्रवत्तामभ्यतपत्तस्या अभितप्ताया एतान्यक्षराणि सम्प्रास्रवन्त भूर्भुवः स्वरिति॥२॥



प्रजापतिने लोकांसाठी ध्यानरूप तप केले त्या अभितप्त लोकांपासून त्रयी विद्या प्रजापतीच्या मनात प्रादुर्भूत झाली. तेव्हा त्या विद्येला अनुलक्षून त्याने पुन्हा ध्यानरूप तप केले तेव्हा त्या अभितप्त विद्येपासून भूः भुवः स्वः ही अक्षरे म्हणजेच तीन व्याहृती उत्पन्न झाल्या. म्हणजेच तीन शब्दांचे उच्चारण झाले.

© www.madhaveeragnuveer.com

५ जुलै २०१९



तान्यभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्य: ॐकार संप्रास्रवत् यथा शङ्कुना सर्वाणि पर्णानि संतृण्णान्येवम् ॐकारेण सर्वा वाक्संतृण्णोंकार एवेदं सर्वम् ॐकार एवेदं सर्वम् ॥३॥

त्या तीन अक्षरांचे (भू: भुव: स्व:) प्रजापतिने आलोचन केले. त्यांचे सार काढण्यासाठी त्याने ध्यानरूप, विचाररूप तप केले तेव्हा ॐ काराची निर्मिती झाली. व्यवहारात ज्याप्रमाणे पानाच्या नसा, शिरा संपूर्ण पानभर पसरलेल्या असतात त्याप्रमाणे ओंकाराने सर्व वाणी व्याप्त आहे. वाणीचा जो म्हणून आविष्कार आहे तो ॐ काराचाच विलास आहे. सर्व वर्ण - अ आ इ, हे ओंकारापासूनच निर्मित आहेत. आणि त्या त्या शब्दाच्या उच्चारणानंतर त्या त्या पदार्थांची निर्मिती झाली Let there be light & light was there. म्हणजेच सर्व विश्वाची निर्मिती ॐ कारापासूनच झाली. म्हणून इदम् / हे म्हणून जे जे दाखवता येते ते सर्व दृश्य जगत म्हणजे ॐ कारच आहे.

x

आपल्या इंद्रियांना जे दिसत नाही, जे अदृश्य अमूर्त आहे. त्याचा विचार करण्याचे सामर्थ्य माणसापाशी आहे. अतींद्रियाची कल्पना करून माणसाने शास्त्र, तत्त्वज्ञान, उच्च गणित (शून्याचा शोध) नीतितत्त्वे, नाना प्रकारचे आदर्श निर्माण केले. या जगात पशूला प्रवेश नाही. परंतु माणसाला स्वत:ला कळलेला अर्थ दुसऱ्याला सांगितल्याखेरीज चैन पडत नाही. आणि त्यासाठी काही संकेत, चिन्हे वापरावी लागतात. आणि संकेतांच्या साम्राज्यात

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

शब्दाला पहिले स्थान आहे. सर्व शब्दांमध्ये ॐ हा सर्वव्यापी, सुलभ शब्द असल्याने माणसामे (मिळवलेल्या) सर्वोच्च ज्ञानासाठी (आत्मज्ञानासाठी) ॐ वापरतात.

प्रजापतिने जे तप किंवा ध्यानसाधना केली, त्यासाठी निदिध्यास हवा. निदिध्यासाशिवाय आत्मज्ञान अन्य मार्ग नाही. कोणत्याही संप्रदायाच्या साधकाच्या साधनाचे पर्यवसान ध्यानात झाले तरच त्याचा मार्ग योग्य आहे असे म्हणता येईल.

ध्यान करणे म्हणजे अदृश्याची संगत धरणे होय. ते केवळ अर्थरूप असल्याने तिथे पोहोचण्यासाठी आणि टिकून राहण्यासाठी ॐकारासारखा सहजसुलभ उपाय नाही. नामस्मरणाचा तोच लाभ आहे. आणि मुख्य म्हणजे नामाने साधलेले ध्यान प्रपंचातील इतर कर्तव्ये करत असताना देखील टिकून राहते.

© www.madhaveeraghu.com

२.२४

# चतुर्विंशति खण्डः॥

पूर्वमीमांसेत वर्णन केल्याप्रमाणे नेव्हाही सामान्य माणूस सुखवादी होता. या जगात देहाच्या आधाराने आपण जी जी सुखे भोगतो ती ती सर्व सुखे दोषयुक्त आहेत.

अतृप्ति, अशाश्वतता, परावलंबित्व इ० दोष काढून टाकून तेच भोग यथेच्छ भोगण्याचे स्थान म्हणजे स्वर्ग होय. आणि स्वर्गात अनेक देवता राहतात. आणि त्या यज्ञकर्त्या पुरुषावर कृपाही करतात. त्यामुळे त्यांची कृपा संपादन करून मरणोत्तर स्वर्गाचा खात्रीपूर्वक लाभ मिळवण्यासाठी अनेक लोक अनेक प्रकारचे यज्ञ करत असत.

स्वर्ग होय सर्वश्रेष्ठ प्राप्त करण्याजोगी गोष्ट आहे. स्वर्गाहून श्रेष्ठ दुसरे काहीही नाही. अशी दिखाऊ भाषा अविवेकी लोक बोलत असतात. अनेक भोग व ऐश्वर्य मिळवून देणाऱ्या या भाषेमुळे अनेकजण आकृष्ट होतात.

यामिमां पुष्पितां वाचं: ----

कामात्मान: स्वर्गपरा ----

मात्र अशा पुरुषांची परमात्म्याविषयी निश्चयी बुद्धि असत नाही. पूर्वी कर्मकांडामध्ये यज्ञाला विशेष महत्त्व होते. कालांतराने मीमांसाकारांनीही आत्म्याचा मोक्ष हेच जीवनाचे ध्येय ठरवले आणि मग उपनिषदातही यज्ञांना गौणत्व आले. भू: भुव: स्व: जन: तप: महः सत्यम् ब्रह्मलोक

ब्रह्मवादिनो वदन्ति यद् वसूनां प्रातःसवनं रुद्राणां माध्यन्दिन सवनमादित्यानां च विश्वेषां च देवानां तृतीयसवनम् ॥१॥

यज्ञामध्ये तीन सवने असतात. सकाळी, माध्यान्ही व संध्याकाळी. त्या प्रत्येक सवनाच्या देवता व छंद निरनिराळे आहेत.

सोमवल्ली कुटणे, गाळून रस काढणे इ० विधिंना सोमयागामध्ये सवन म्हटले आहे तर इतर यज्ञात तुपाची आहुति देणे, हव्यसामग्रीची आहुति देण्याला सवन म्हटले आहे. खरं पाहिलं तर जीवन हाच एक यज्ञ आहे.

२४ अक्षरे | पहिली २४ वर्षे - प्रातःसवन - गायत्री छंदातून
४४ " | पुढची ४४ वर्षे - माध्यंदिन सवन - त्रिष्टुभ छंदातून
४८ " | त्यानंतरची ४८ वर्षे - तृतीय सवन - जगती छंदातून

करावे असे सांगितले जाते.

| प्रातःसवन - वसु | माध्यंदिन - रुद्र | तृतीय सवन - आदित्य विश्वेदेवा |
|---|---|---|
| भूः लोकावर विजय | भुवः लोकावर विजय | स्वर्लोकावर विजय |

क्व तर्हि यजमानस्य लोक इति स यस्तं न विद्यात् कथं कुर्यात् अथ विद्वान् कुर्यात् ॥२॥

तर मग यजमानाचा लोक कुठला? यजमानाला जर हे माहीत नसेल तर तो यज्ञाचे अनुष्ठान कसे करणार? अर्थात हे सर्व माहिती असणाराच यज्ञ करेल?

© www.madhaveeraghuveer.com

पुरा प्रातः अनुवाकस्य उपाकरणात् मध्येन गार्हपत्यस्य उदङ्मुखः उपविश्य सः वासवं साम अभिगायति॥७॥

ऋग्वेदातील ज्या मंत्रांचे गायन केले जाते त्यांना 'साम' म्हणतात तर ज्यांचे गायन केले जात नाही, नुसते पठण केले जाते त्यांना 'शस्त्र' म्हणतात आणि त्यापैकी ज्यांचे पठण प्रातःकाळी केले जाते त्यांना प्रातरनुवाक म्हणतात. या प्रातरनुवाकाच्या प्रारंभीच्या पूर्वी गार्हपत्य अग्निच्या पश्चात भागी उत्तरेकडे तोंड करून बसून यजमानाने वसुदैवत्य सामाचे गायन करावे.

यज्ञशाळेत तीन प्रकारचे (त्रेताग्नि) असतात. हे तीनही अग्नि वेगवेगळ्या आकाराच्या कुंडामध्ये ठेवलेले असतात. मध्यभागी मुख्य अग्नि म्हणजे गार्हपत्य अग्नि गोल कुंडात ठेवलेला असतो. गृहपतीने अरणीने मंथन करून हा अग्नि प्रज्वलित केलेला असतो. या अग्निचे रक्षण गृहपती मनापासून करतो. घरात अग्नि प्रज्वलित नसणे हे गृहस्थाला मानहानिकारक असू शकते. यज्ञप्रसंगी याच कुंडातून अग्नि उचलून यज्ञकुंडात ठेवला जातो. याला उद्धरण / प्रणयन असे म्हणतात.

आहवनीय अग्नि - याचे आयतन (कुंड) चौकोनी असते. हा गार्हपत्याच्या पूर्वेला असतो आणि यात देवांसाठी आहुती दिल्या जातात.

दक्षिणाग्नि - हा गार्हपत्य अग्निच्या दक्षिणेला असतो. त्याचा आकार चंद्रकोरीप्रमाणे असतो. याच्यावर अन्वहार्य चरु शिजवला जातो. ∴ याला अन्वहार्यपचन असे म्हणतात.

©www.madhaveeraghuveer.com

TDS payment of March



लोऽ३ कद्वारमपावा ३ र्णू ३३ पश्येम त्वा वयं रा३३३३ हु ३ म् आ ३३ ज्या ३ यो ३ आ ३२१११ इति ।।

हे अग्ने तू या लोकाचे द्वार उघड (अपावार्णु) म्हणजे राज्यप्राप्तिसाठी आम्ही तुझे दर्शन घेऊ शकू.
भूः ची प्राप्ति प्रातः सवनाने व वसु देवतेचे साम गायल्यामुळे होते. म्हणजेच त्याला भूलोकावर समृध्दी, यश इ० सर्व मिळते.
यातील १,२,३ हे आकडे तो स्वर किती लांबवायचा याचे निदर्शक आहेत. अशा पध्दतीने साम गायन केले तर अग्नि ही प्रार्थना ऐकतो व प्रसन्न होतो.

अथ जुहोति नमोऽग्नये पृथिवीक्षिते लोकक्षिते लोकं मे यजमानाय विन्देष वै यजमानस्य लोक एतास्मि ।। ५ ।।

हे अग्ने, आम्ही पृथ्वीवर राहणारे इहलोकवासी तुला नमस्कार करतो. माझ्या यजमानांना तू या पृथ्वीलोकाची प्राप्ति करून दे. या मंत्राद्वारे आम्ही हवन करतो. हा



खरोखर यजमानांचा लोक आहे हा मी प्राप्त करणार आहे.

अत्र परस्तादायुषः स्वाहापजहि परिघमित्युक्त्वोत्तिष्ठति तस्मै प्रातःसवनं संप्रयच्छन्ति ।। ६ ।।

इथे यज्ञ करत असताना काय म्हणायचे, काय करायचे हे व्यवस्थित सांगितले आहे.
हे मंत्र म्हटल्यानंतर यजमान 'स्वाहा' म्हणून अग्नित

© www.madhaveeraghuveer.com

गार्हपत्य —— प्रातःसवन - देवता (अग्नि) ८ जुलै २०१८
दक्षिणाग्नि — माध्यंदिनसवन " रुद्र
आहवनीय — तृतीयसवन " वैश्वदेव



आहुति देतो. आणि आहुति दिल्यावर या पृथ्वीलोकाची कडी काढ असे म्हणून जागेवरून उठतो. अशा प्रकारे साम मंत्र होम व उत्थान द्वारा प्रातःसवनाशी संबंधित लोक वसूकडून मागून घेतो. ही देवाणघेवाण चालते.

पुरा माध्यंदिनस्य सवनस्य - - - - साम्नाभिगायति ||
लो३ कद्वार - - - - - - - ३२९९९ इति || ८ ||
अथ जुहोति नमो - - - - - लोक एतास्मि || ९ ||
अत्र यजमान: परस्तादायुष: - - - - सम्प्रयच्छाति || १० ||

माध्यंदिन सवनाचा देव रुद्र आहे. हे सवन सुरु करण्यापूर्वी यजमान दक्षिणाग्निच्या पाठी उत्तरकडे तोंड करून बसतो. व रुद्रदेवतासंबंधी सामगायन करतो. आणि वायुला अंतरिक्ष लोकांचे द्वार उघडायला सांगतो. त्यातून वैराज्यपदाच्या प्राप्तिची इच्छा करतो. त्यानंतर तो अग्नित आहुति देतो. तेव्हा अंतरिक्षात राहणाऱ्या वायुला नमस्कार करून यजमानाला अंतरिक्षलोक मिळावा अशी प्रार्थना करतो.

इथे आता 'आयुष्य समाप्त झाल्यावर अंतरिक्ष लोक प्राप्त करीन.' 'स्वाहा' अशी आहुति देऊन लोकद्वाराची कडी काढण्याची (अर्गला) प्रार्थना करतो. हे झाले माध्यंदिन सवन!

पुरा तृतीयसवनस्य - - - - वैश्वदेवं साम्नाभिगायति ||११||
लो३ कद्वारमपावा - - - - ३२९९९ इति ||१२||१३||
अथ जुहोति नम - - - - यजमानाय विन्दत ||१४||

APRIL
9
TUESDAY

फाल्गुन कृ. १४ संवत २०६९
मंगळवार ९/४/२०१३

| MARCH 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

आता तृतीय सवनापूर्वी यजमान आहवनीय अग्नीच्या मागे उत्तरेकडे तोंड करून बसतो. व आदित्यविषयक आणि विश्वेदेवविषयक सामांचे गायन करून कोंडवार उघडण्याची प्रार्थना करतो.

© www.madhaveeraghuveer.com

# तृतीय अध्याय

## - प्रथम खण्ड -

मागील अध्यायात यज्ञाचे यथार्थ रूप सांगितले. आता या अध्यायात फलस्वरूप आदित्य उपासनेबद्दल सांगत आहेत.

असौ वै आदित्य: देवमधु: । तस्य द्यौ: एव तिरश्चीन वंश:
अन्तरिक्षम अपूप: मरीचय: पुत्रा: ।।१।।

असौ - जो दिसतो पण दूर आहे. उदा. (अदस् सर्वनाम) हा दूर दिसणारा आदित्य देवासाठी मधु आहे. द्युलोक हा तिरका बांबू आहे. त्यावर मधाचे पोळे लटकलेले आहे व अंतरिक्ष हेच मोहोळ आहे आणि या सूर्याची किरणे म्हणजे या मोहोळात असलेली मधमाशांची पिल्ले आहेत.
कवीची सौंदर्यदृष्टी दिसून येते.

तस्य ये प्राच्यो रश्मय: ता एव अस्य प्राच्यो मधुनाड्य: ।
ऋच एव मधुकृत ऋग्वेद एव पुष्प ता अमृता आप:
ता वा एता ऋच्या: । एतम् ऋग्वेदम अभ्यतपन तस्य
अभितप्तस्य यश: तेज इन्द्रियं वीर्य अन्नरसम् अजायत ।।

त्या सूर्याची पूर्वेकडे जाणारी किरणे या जणू काही पूर्व दिशेवरील मधुनाड्या आहेत. म्हणजे अंतरिक्षरूपी पोळ्याच्या बारीक बारीक छिद्रातून मध … असतो ती छिद्रे आहेत. ऋग्वेदातील ऋचा या जणू काही मधमाशा

With Best Compliments from

APRIL
13
SATURDAY

ऋग्वेद - आदित्याच्या पूर्व भागात आश्रय - लाल (रोहित) रंग

चैत्र शु. ३ संवत २०६९
शनिवार १३/४/२०१३

MARCH 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

आहेत ऋग्वेद हे फूल आहे. सोम म्हणजे त्यातील रस आहे.
त्याप्रमाणे मधमाशा मध काढून आणताना त्यावर काही प्रक्रिया करतात, त्यामुळे तो मध टिकाऊ होतो. त्याचप्रमाणे जणू ऋचांनीच ऋग्वेदाला अभिमंत्रित करून प्रक्रिया केली आहे व त्यातून यश, तेज, वीर्य, अन्नादिरूप रस निर्माण झाला आहे.
ऋग्वेदात सांगितलेली कर्मे म्हणजे ऋग्वेदाचे फूल म्हटले आहे. ऋग्वेदात स्वर्गप्राप्तिसाठी अनेक सकाम यज्ञ सांगितले आहेत. हविर्द्रव्य अग्निला समर्पण करून, मंत्रोच्चाराने जे मोक्षरूपी फल प्राप्त होते ते अमृताप्रमाणे रसपूर्ण असते. यज्ञाचे फलस्वरूप यश, कीर्ति, तेज, इंद्रियांना शक्ती, अन्न मिळते. या यज्ञाने देव तृप्त होतात.

तद् व्यक्षरत् तत् आदित्यम् अभितः अश्रयत् तत् वा एतद् यत् एतत् आदित्यस्य रोहितं रूपम् ॥४॥

व्यक्षरत् - विशेष रूपाने गेला.

SUNDAY, APRIL 14 डॉ. आंबेडकर जयंती चैत्र शु. १० संवत २०६९

ऋग्वेद मंत्रात सांगितलेला यश, तेज, अन्नादि पर्यंतचा रस सांगितला आहे तो विशेषरूपाने आदित्यापर्यंत पोहोचला. त्या रसाने आदित्याच्या पूर्व भागात आश्रय घेतला. म्हणून उगवताना आदित्याचे लाल-रोहित (रक्तवर्णी) रूप दिसते

यजुर्वेद - दक्षिण भागात आश्रय
शुक्ल रूप

PF payament

द्वितीय: खण्ड:

अथ येऽस्य दक्षिणा रश्मयः ता एव अस्य दक्षिणा मधुनाड्यः यजूंषि एव मधुकृतः। यजुर्वेद एव पुष्पम्। ताः अमृताः आपः ॥१॥

या आदित्याचे दक्षिण दिशेकडील किरणे म्हणजे या अंतरिक्षरूप मोहोळाच्या दक्षिण दिशेकडील मधुनाड्या आहेत. यजुर्वेदातील मंत्र हे मधमाशा आहेत. यजुर्वेद हे पुष्प असून सोमादिरूप अमृतच हे आप आहे.
यजुर्वेदात सांगितलेल्या कर्माचे फळ म्हणजे अमृत होय.

तानि वा एतानि यजूंषि एतम् यजुर्वेदम् अभ्यतपन् तस्य अभितप्तस्य यशः तेजः इन्द्रियं वीर्यम् अन्नाद्यं रसः अजायत ॥२॥ तद् व्यक्षरत् तद् आदित्यम् अभितः अश्रयत्। तत् वै एतद् यत् एतत् आदित्यस्य शुक्लं रूपम्॥

त्या त्या यजुर्वेदातील मंत्रांनी यजुर्वेदाला अभितप्त करून (प्रक्रिया करून) यापासून यश, तेज, इंद्रिय, वीर्य, अन्नाद्य रूपी रस निर्माण केला. तो रस आदित्याच्या जवळ जाऊन त्याने आदित्याच्या दक्षिण भागाचा आश्रय घेतला. आदित्याचे जे शुक्ल रूप दिसते ते म्हणजे हाच रस होय.

© www.madhaveeraghuveer.com

तृतीय खण्ड

© www.madhaveeraghuveer.com

ઉત્તરકાંડસર્ગ ક્રિયા: મધુમાડા

**MAY 2013**

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

ઈતિહાસપુરાણમ્: (મહાભારત)

આથર્વણઆંગિરસ: અત્યંત ક્રૂર કર્મ

પારિપ્લવ રાત્રિ: આત્મમેધ ...

चैत्र शु. ७ संवत २०६९

बुधवार १७/४/२०१३

**APRIL**

**17**

**WEDNESDAY**

ચતુર્થી: ૨૦૦૬

8

9

10

11

12

1

2

3

4

5

6

7

8

© www.madhaveeraghuveer.com

APRIL
# 18
THURSDAY

चैत्र शु. ८ संवत २०६९
गुरूवार १८/४/२०१३

उन्हात दिसणारी सोनेरी किरणे
कमळ हेच पुष्प - आदित्याच्या मध्यभागी
दिसणारा शोभा हे सर्व
रूप आहे

परिणाम: [illegible]

MARCH 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com

छांदो :: ३।६।१ :

तद्यत् प्रथमम् अमृतं तत् वसवः उपजीवन्ति अग्निना मुखेन न वै देवा अश्नन्ति न पिबन्ति एतद् एव अमृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥

आदित्याच्या पूर्व भागात आश्रय घेतलेला रस रोहित (लाल) वर्णाचा होऊन आदित्यात राहतो. वसुगण अग्निप्रधान होऊन त्या अमृताच्या योगाने उपजीविका करतात. त्यावर ते जीवन धारण करतात. प्रातःसवनाचे अधिकारी (वसुगण) असतात. ते स्वतः खात / पीत नाहीत तर ते केवळ पाहून तृप्त होतात. आदित्याच्या आश्रयाला आलेल्या रसात कोणताही दोष राहत नाही. त्याचा उपभोग ते घेतात. ते यश ऐकतात. तेज पाहतात. वीर्य म्हणजे प्राणवत्ता! त्याचा ते अनुभव घेतात.

त एतद् एव रूपम् अभिसंविशन्ति एतस्मात् रूपात् उद्यन्ति ।

अश्रद्धेने किंवा कामनायुक्त कर्म केले असता देव उदास होतात. कारण यात त्यांना काहीच मिळणार नसते. परंतु कोणी निष्काम कर्म केले तर त्यातून त्यांना लाभ होणार असतो. म्हणून ते उत्साहित होतात.

श्रद्धेने, प्रामाणिकपणे केलेल्या कर्माला मंत्रादिंमुळे अमृतत्व प्राप्त होते.

असे हो जया अंतरी भाव जैसा
वसे हो जया अंतरी देव तैसा
अनन्यास रक्षितसे चापपाणि
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥

स य एतत् एव अमृतं वेद वसूनाम् एव एको भूत्वा अग्निना एव मुखेन एतत् एव अमृतं दृष्ट्वा तृप्यति स एतद् एव रूपम् अभिसंविशति एतस्मात् रूपात् उदेति।

जो या अशा अमृताला जाणतो तो अष्ट वसूंपैकी एकाशी एकरूप होऊन अग्निमुखाने हे अमृत पाहून तृप्त होतो. तो भोगाच्या वेळी सावध होतो व भोग संपल्यावर उदासीन होतो.

कर्मात दोष असल्यास तो उदासीन होतो. व कर्म शुद्ध असल्यास उत्साहित होतो.

देवाला स्थूल वस्तूशी काही देणे-घेणे नसते. त्या मागचा शुद्ध भाव त्यांना आवडतो. त्यामुळे हे ध्यानात ठेवायचे की कर्माचे अवडंबर माजवण्यापेक्षा त्यामागील भोळा भाव देवाला आवडतो.

एका तुळशीपत्राने भगवंत म्हणजे बांधला गेला.
पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।



स यावत् आदित्यः पुरस्तात् उदेता पश्चात् अस्तम् एता वसूनाम् एव तावद् आधिपत्यं स्वाराज्यं पर्येता। (प्राप्त करतो)

जो हे जाणतो तो विद्वान जाणकार होतो जोपर्यंत सूर्य पूर्वेला उगवतो व पश्चिमेला मावळतो तोपर्यंत तो वसूंपैकी एक होऊन त्यांचे आधिपत्य व स्वाराज्य प्राप्त करतो.
आचंद्रसूर्य | यावत्चंद्रदिवाकरौ - हे तेज त्याला प्राप्त होते.

© www.madhavghuveer.com